श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

# बाणगंगा

**अंक १० वा**

**सन २०१८-२०१९**

संपादक
**डॉ. विजय जाधव**
प्राचार्य

कार्यकारी संपादक
**डॉ. भाऊसाहेब मुळे**

**✲ संपादक मंडळ ✲**

प्रा. डॉ. शेख राजमोहंमद
प्रा. त्रिवेणी गाडे
प्रा. साठे भास्कर
प्रा. पुंडे मनिषा
प्रा. काळे वर्षा
प्रा. मोहिते चेतना
प्रा.डॉ. सौ. कीर्तने वर्षा

प्रकाशक

**डॉ. विजय जाधव**

प्राचार्य

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

---

सदर अंकात प्रसिध्द करण्यात आलेले लेख, कविता यातील मते संबंधित लेखक, कवींची आहेत.
या मताशी संपादक मंडळ, महाविद्यालय व संस्था सहमत असेलच असे नाही.

# श्री बाणेश्वर शिक्षण संस्था

## विश्वस्त व कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | सभासदाचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | **श्री. शिवाजीराव भानुदास कर्डिले** | अध्यक्ष |
| २ | **श्री. महादेव हरिभाऊ जाधव** | उपाध्यक्ष |
| ३ | **श्री. गोरखनाथ दौलत साठे** | सचिव |
| ४ | **श्री. सोमनाथ तुळशीराम गुंजाळ** | सहसचिव |
| ५ | **श्री. त्र्यंबक हरीभाऊ कर्डिले** | खजिनदार |
| ६ | **श्री. बाळासाहेब त्र्यंबक वाघ** | सदस्य |
| ७ | **मा. अक्षय शिवाजीराव कर्डिले** | सदस्य |
| ८ | **श्री. जनार्दन राधाकिसन कर्डिले** | सदस्य |
| ९ | **श्री. उत्तम चिमाजी जाधव** | सदस्य |
| १० | **श्री. भाऊसाहेब गंगाधर कर्डिले** | सदस्य |
| ११ | **श्री. प्रकाश कुंडलिक कर्डिले** | सदस्य |

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

## महाविद्यालय विकास समिती

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री. शिवाजीराव भानुदास कर्डिले | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. गोरखनाथ दौलत साठे | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. विजय मच्छिंद्र जाधव | सचिव |
| ४) | श्रीमती चेतना प्रमोद माहिते | सदस्या |
| ५) | डॉ. भाऊसाहेब माणिकराव मुळे | सदस्य |
| ६) | डॉ. राजमोहंमद हसन शेख | सदस्य |
| ७) | प्रा. सौ. मनिषा नारायण पुंडे | सदस्या |
| ८) | सौ. शैला गिरीष साठे | सदस्या |
| ९) | श्री. काशिनाथ मारूती हापसे | सदस्य |
| १०) | सौ.डॉ. संध्या लक्ष्मण भंगाळे | सदस्या |
| ११) | श्री. ईश्वर बाजीराव गिरवले | सदस्य |
| १२) | मा. अक्षय शिवाजीराव कर्डिले | सदस्य |
| १३) | प्रा. वर्षा अविनाश काळे | सदस्या |
| १४) | श्री. महेश बाबासाहेब कर्डिले | सदस्य |

# प्राचार्यांचे मनोगत....

विद्यार्थी बंधू-भगिनींनो,

बाणगंगा या वार्षिक नियतकालीकाचा दहावा अंक आपल्या हाती देतांना व त्याव्दारे आपणाशी संवाद साधताना मला विशेष आनंद होत आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत बुऱ्हाणनगरचे आराध्यदैवत आई तुळजाभवानीच्या आशीर्वादाने शैक्षणिक विचारांची शिदोरी बरोबर ठेवत बहुजन समाजाच्या उध्दाराचे स्वप्न उराशी बाळगुन मा. आ. शिवाजीराव कर्डिले यांनी १९८९ साली श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना केली. अल्पावधीतच ज्ञानाची गंगोत्री बुऱ्हाणनगरमध्ये प्रवाहित केली. प्राथमिक,माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची वन वन थांबवून शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी खुले केली व अल्पावधीतच या संस्थेने मोठी प्रगती साधली याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री बाणेश्वर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय होय.

जुन २००४ मध्ये अवघ्या ५७ विद्यार्थी व ६ प्राध्यापकांवर सुरु झालेल्या या महाविद्यालयात सध्या १०७७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ३२ प्राध्यापक ज्ञानदानाचे कार्य करत आहेत.

बदलत्या प्रवाहाचा मागोवा घेत महाविद्यालयाने पारंपरिक उच्च शिक्षणाबरोबर व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केले आहेत. नवनवीन अभ्यासक्रमाव्दारे उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता टिकवत असतानांच ग्रामीण भागातील आमचा विद्यार्थी खासगीकरणाच्या युगात २१ व्या शतकात आव्हाने पेलण्यास समर्थ बनला पाहिजे. ही भूमिका स्वीकारुन यासाठी आम्ही आवश्यक ती कौशल्ये, मुलाखत तंत्र, सामान्य ज्ञान, सॉफ्टस्कील डेव्हलपमेंट प्रोग्राम सारखे उपक्रम राबवित आहोत. ग्रामीण भागातील मुला-मुलींना उच्च शिक्षण पूर्ण करता यावे, त्यांच्यात श्रमसंस्कार रुजावेत, यासाठी 'कमवा व शिका' योजनेंतर्गत शिक्षण पूर्ण करण्याची संधी महाविद्यालयाने दिली. या बरोबरच विद्यार्थी कल्याण मंडळाच्या सर्व योजना व उपक्रमांमध्ये महाविद्यालय सहभागी होऊन नव भारताचे भावी आधारस्तंभ सक्षम करण्याचा महाविद्यालय प्रयत्न करीत आहोत.

या वर्षीचा 'बाणगंगा' हा दहावा अंक साकार करण्याचा आम्ही प्रयत्न केला. संस्थेच्या सहकार्याने प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे या अंकाची निर्मिती झाली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या साहित्यीक गुणांना वाव देण्यासाठीचे चांगले व्यासपीठ आहे व त्यात विद्यार्थी उत्स्फुर्तपणे सहभागी होतात,हे पाहून आनंद वाटतो.

अशा या बाणगंगाच्या दहाव्या अंक निर्मितीसाठी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षणप्रेमी व्यक्तींनी सहकार्य केले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

धन्यवाद !

**- डॉ. विजय जाधव**
**प्राचार्य**

# संपादकीय...

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शिवाजीराव कर्डिले व इतर संचालक मंडळ यांनी सन १९८९ साली केली. या माध्यमातून सर्वप्रथम माध्यमिक शाळा सुरु केली. नंतर उच्च माध्यमिकचे वर्ग सुरु केले. पंचक्रोशीतील इतरही ठिकाणी शिक्षणाची गरज पाहता त्याही ठिकाणी माध्यमिक शाळा सुरु केल्या.

उच्च शिक्षणाची मागणी आणि विशेषतः मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून या संस्थेने सन २००४ साली श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयाच्या माध्यमातून अनेक गरीब मुलामुलींना, उपेक्षित घटकातील व खेड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळू लागले. या शिक्षणातून सर्वच घटकातील विद्यार्थ्यांचे जीवन समृध्द होण्यास मदत होत आहे हे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीतून सिध्द होताना दिसते.

महाविद्यालयीन युवक हा उद्याच्या पिढीचा सुजाण नागरिक असतो. उच्च शिक्षणाने त्याच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत असतात. समाजात घडणाऱ्या घटनांकडे तो स्वतःच्या नजरेने पाहत असतो आणि त्याचा अन्वयार्थ स्वतःच लावण्याचा प्रयत्न करीत असतो. या महाविद्यालयीन युवकांपुढे अनेक प्रकारचे माहितीचे मायाजाळ आहे. त्याच्या भोवती घडणाऱ्या सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक आणि वैयक्तिक घटनांचा त्याच्यावर अनुकूल प्रतिकूल परिणाम होत असतो. या घटनेच्या निरीक्षणातून त्याची वैचारिक बांधणी होत असते. हाच विचार शब्दबध्द करण्याचा अनेकदा तो प्रयत्न करीत असतो. मात्र त्याला व्यक्त होण्यासाठी विचारपीठ उपलब्ध होत नाही. त्याच्या या वैचारिक भावना व्यक्त करण्यासाठीच महाविद्यालयाचे हे नियतकालिक असते.

या नियतकालिकातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपापल्या भावभावना लेख, काव्य अथवा छोट्या चुटकुल्यातून व्यक्त केल्या आहेत. वैयक्तिक भावभावनांसोबत सामाजिक, राजकिय, शैक्षणिक विचारांवरही भाष्य व मंथन यात आले असून ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरणारा हा विद्यार्थी, वैज्ञानिक प्रगतीचा शोध बोधपर विचारही या नियत कालिकात मांडू लागला आहे. जीवनाच्या विविध अंगांचे दर्शन आपल्या लेखाच्या व कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घडविले आहे.

महाविद्यालयाच्या हा दहावा वार्षिक अंक आहे. या अंकातील विविध लेखांचा आपण आस्वाद घ्यावा हीच सर्व संपादक मंडळाची इच्छा आहे. म्हणूनच हा अंक अधिकाधिक आकर्षक बनविला आहे. या अंकासाठी संपादक मंडळातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतलेले कष्ट व परिश्रम स्तुत्य आहेत. त्याबद्दल सर्वांना धन्यवाद देतो.

**कार्यकारी संपादक**
**प्रा. डॉ. भाऊसाहेब माणिकराव मुळे,**
**मराठी विभाग प्रमुख**

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

## महाविद्यालय शिक्षक व शिक्षकेतर वर्ग २०१८-२०१९

समाजशास्त्र विभाग
डॉ. जाधव व्ही. एम. (प्राचार्य)

मराठी विभाग
प्रा. डॉ. मुळे बी. एम.
प्रा. डॉ. कीर्तने व्ही.एस.

वाणिज्य विभाग
प्रा. गाडे टी.डी.
प्रा. दरेकर ए.व्ही
प्रा. वारे नेहा
प्रा. के.एस. जाधव

बी.सी.ए. विभाग
प्रा. वर्षा कर्डिले
प्रा. दारुणकर प्रेरणा
प्रा. पवार स्नेहल

लेखाधिकारी
श्री. विधाते ए.बी.

परीक्षा विभाग
सौ. शैला साठे

शिष्यवृत्ती
श्री. रविंद्र भालसिंग

लिपिक
श्री. महेश कर्डिले

हिंदी विभाग
प्रा. डॉ. शेख आर.एच.
प्रा. राणी केदार

इतिहास विभाग
प्रा. सोनवणे एस.आर.
प्रा. राणी केदार

बी.सी.एस. विभाग
प्रा. काळे व्ही. ए.
प्रा. तृप्ती बोंदर्डे
प्रा. योगेश ढगे
प्रा. तेजस्वी गुंजाळ

ग्रंथालय विभाग
प्रा. सचिन झोंड

शिपाई
श्री. कर्डिले एस.वाय.
श्री. नवनाथ साळवे
श्री. योगेश थोरवे
श्रीमती लोखंडे जे.एल.

प्रा. नागपुरे योगेश

इंग्रजी विभाग
प्रा. मेघा खोल्लम

भूगोल विभाग
प्रा. साठे बी.जी.

राज्यशास्त्र विभाग
प्रा. खांदवे एस.टी.

क्रीडा विभाग
प्रा. पुंडे एम.एन.

बी.एस्सी. विभाग
प्रा. मोहिते चेतना
प्रा. वाघ स्वाती
प्रा. लहारे निलिमा
प्रा. चैताली वैद्य
प्रा. बांगरे सर
प्रा. लोखंडे मॅडम
प्रा. धर्माधिकारी मॅडम
प्रा. कोमल सोनवणे
प्रा. नामदे पूजा
प्रा. अडसुळे अनिकेत

# बाणगंगा

सन २०१८-२०१९

## अनुक्रमणिका


| विभाग | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| मराठी | ०९ |
| अहवाल | ५४ |

# मराठी विभाग

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ साली झाला.त्यांना बाबासाहेब आंबेडकर या नावाने ओळखत. आंबेडकरांनी कोलंबिचा विद्यापीठ या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या दोन्हीतून अर्थशास्त्रातील डॉक्टरेट पदव्या मिळवल्या. आपल्या सुरुवातीच्या कारकिर्दीत ते अर्थतज्ञ, प्राध्यापक आणि वकील होते. त्यांनी नंतरच्या जीवनात राजकीय कार्यावर लक्ष केंद्रीत केले. इ.स. १९९० साली त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला. आंबेडकरांना बी.ए. एम.ए. पी.एचडी. एम. एस्सी. डी.एस.सी. बार –ॲट–लॉ, एल.एल. डी.डी लीट इ. पदव्या प्रदान करण्यात आल्या.

या महामानवाने कोठून एवढी सहनशीलता, अध्ययनशीलता व शिक्षण संपादनाची अक्षम्य इच्छा कायम राखण्याची शक्ती मिळविली याचेच आश्चर्य वाटते. त्या साठीच त्यांचे काही शैक्षणिक विचार त्यांनी मांडले आहे.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. त्याचा योग्य उपयोग झाला पाहिजे असे डॉ. आंबेडकर यांना वाटत असे. जो समाज अशिक्षित असतो तो शिक्षणा अभावी सर्वस्व गमावलेला असतो. शिक्षणाने माणसात कर्तव्य आणि हक्काची जाणीव निर्माण होते. स्त्रियांना उत्तम शिक्षण दिले तर त्या मुलांवर बालवयातच चांगले संस्कार लादू शकतात, व देशाचे उत्तम,जागरुक नागरिक घडवायला महत्वाचा वाटा उचलू



शकतात.प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, पालकांनी मुलगा किंवा मुलीला शाळेत प्रवेश दिला म्हणजे त्यांचे किंवा तिचे शिक्षण लिहिता वाचण्याच्या अवस्थेपर्यंत राहू नये तर संपूर्ण पणे उच्च शिक्षण घेऊन सुशिक्षित होऊनच मुले बाहेर पडावी व पुढील आयुष्यातही ज्ञान अवगत करीत रहावे. डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्व त्याची अपरिहार्यता ओळखली होती. म्हणूनच त्यांनी आपल्या अनुयांना सर्वप्रथम शिक्षण घेण्याचा संदेश दिला.

बौध्दिक विकास हाच मानवाच्या अस्तित्वाचे मुख्य लक्ष्य असले पाहिज. आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना काही त्यांच्या विचारांचा कानमंत्र दिला आहे. ते विचार पुढीलप्रमाणे (१) आपण सर्वांत आधि आणि शेवटी एक भारतीय आहोत. (२) शाळा हे सभ्य नागरिक तयार करण्याचे पवित्र क्षेत्र आहे. (३) शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. (४) जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचे पुस्तक कारण

भाकरी तुम्हाला जगायला मदत करेल तर पुस्तक कसे जगायचं ते शिकवेल. त्यांचा हा विचार खुप प्रेरणादायी आहे.

शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वतःची जाणीव व्हावी. यासाठी आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व समाजात विशद केले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो पिल तो माणूस ,गुरगुरुल्या शिवाय राहणार नाही, असे ते समाज बांधवांना सांगत . प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे. म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांना प्रतिपादन केलेली आहे. समाजहितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे.

डॉ, बाबासाहेबांचे काही सुविचार :-

१) शिका ! संघटित व्हा ! संघर्ष करा !

२) ग्रंथ हेच गुरु-

३) वाचाल तर वाचाल

४) स्वतःची लायकी विद्यार्थी दशेतच वाढवा

५) शिला शिवाय शिक्षणाची किंमत शून्य आहे.०

**- दळवी संध्या चंद्रभान (SYBA)**

# भारतीय आयुर्वेद एक वरदान

आधुनिक समजल्या जाणाऱ्या बेशिस्त जीवनशैलीने या दिवसामध्ये अनेक समस्यांना जन्म झाला आहे. त्यातून एखादा माणूस वाचण्यात यशस्वी झाला असेल . आधुनिक वैदयक पद्धती या आजारावर पुर्णपणे उपाय न करता फक्त त्यांना दाबण्यात विश्वास ठेवतात. त्यामुळे या आजारांना पुन्हा उभारी घेण्यात मदत मिळते.

याच कारणामुळे लोक पुन्हा आयुर्वेदिक वैद्यकीय पद्धतीकडे वळत आहे. आयुर्वेदाच्या इतिहासाकडे नजर फिरवल्यास आपल्याला कळते की प्राचीन भारतात आयुर्वेद ही अतिशय विकसित चिकित्सा पद्धती होती. वेदाच्या अनेक शाखाच्या अभ्यासात समजते की, आयुर्वेद हा भारतातून अनेक देशात पसरवला आहे.

युरोपीय देशात आयुर्वेद ही एक विकसित चिकित्सापद्धती ही खूप प्रसिद्ध होती. पण भारतीय आणि युरोपिय देशाच्या आयुर्वेद पद्धती मध्ये अंतर होते.

वर्तमान परिस्थितीमध्ये निश्चित रुपाने आयुर्वेदाची प्रासंगिकता वाढली आहे. भारत आणि अशियातील अनेक देशात आयुर्वेद खुप लोकप्रिय होत आहे. ओझोन च्या थराच्या पातळ होण्यामुळे तापमान वाढीमुळे आजार वाढत आहेत. या आजारावर आयुर्वेद ही उत्तम उपचार पद्धती आहे. भारतात अनेक वर्षापासून आयुर्वेद चिकित्सा पद्धती अनेक लोकांना फायदा पोहचवत आहे. त्यामुळे भारतीय आयुर्वेद एक वरदान आहे.

**- विलास ढोणे** (S.Y.Bsc)

# महात्मा फुलेंचे सामाजिक कार्य



महात्मा जोतिबा फुले यांचे पुर्ण नाव ज्योतीराव गोविंदराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला.ज्योतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते , त्यामुळे गोऱ्हे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी, पुढे फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. व तेच नाव पुढे रुढ़ झाले.त्यांचे मुळ गाव कटगुण हे होते.

महात्मा फुले हे मराठी लेखक विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली. शेतकरी आणि बहुजन समांजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. जनतेने त्यांना महात्मा ही उपाधी बहाल केली होती. महात्मा फुलेंवर थॉमस पेन यांच्या 'The Right of Man' या पुस्तकाचा प्रभाव होता.

मानवी हक्कावर इ.स. १७१९ मध्ये थॉमस पेन यांनी लिहिलेले पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्याचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. सामाजिक न्यायाबाबत त्यांच्या मनात विचार येऊ लागले. त्यामुळेच विषमता दुर करण्यासाठी स्त्री शिक्षण आणि मागासलेल्या जातीतील मुलामुलीचे शिक्षण यावर त्यांनी भर देण्याचे ठरवले.सामाजिक भेदभाव त्यामुळे कमी होईल असे त्यांचे निश्चित मत आणि अनुमान होते.

कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे. असे रोखठोकपणे बोलताना मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी शक्ती आहे अशी त्यांची (अस्तिक्यवादी)विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोंविदाने रहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकातुन महाराष्ट्रातील शेतकऱ्याची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाव्दारे विशाल दृष्टीकोनाचा क्रांतिकारक म्हणूनही जोतीरावांचे दर्शन होते. 'नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे.'हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन केले.मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरुन विश्वकुटुंब कसे निर्माण होईल व त्याकरिता कशाप्रकारचे वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे हे ज्योतीराव फुलेंनी आपल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडली आहे.

स्त्री अथवा पुरुष एकंदर सर्व गावाचे , प्रांताचे, देशाचे, खंडाचे संबंधात अथवा कोणत्याही धर्मातील स्वतःच्या संबंधात स्त्री आणि पुरुष या उभयतांनी एकमेकांनी कोणत्याही प्रकारची आवडनिवड न करता या भूखंडावर आपले एक कुटुंब समजून सत्यवर्तन करुन रहावे.

आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणिमात्रांना उत्पन्न करतेवेळी मनुष्यास जन्मतःच स्वतंत्र प्राणी म्हणुन निर्माण केले आहे. आणि त्यास आपापसात साऱ्या हक्कांचा उपयोग घेण्यास समर्थ केले आहे.

आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने सर्व मानवी स्त्री–पुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे. जो आपल्यापासून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस कोणत्याही तऱ्हेने नुकसान देत नाही, अथवा जो कोणी आपल्यावरुन दुसऱ्या मानवांचे हक्क समजून इतरांना पीडा देत नाही त्याला 'सत्यवर्तन'करणारा म्हणावे.

स्त्री अथवा पुरुष जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करुन पोटे भरवण्यास श्रेष्ठ मानतात. परंतु शेतकरी वगैरे यांना मदत करणाऱ्यांचा आदर सत्कार करतात त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे.

आपल्या सर्वांच्या निर्मिकाने एकंदर सर्व स्त्री–पुरुषांस एकंदर सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केले आहे. त्यातून एखादा मानव अथवा काही मानवी टोळ एखाद्या व्यक्तिवर जबरी करु शकत नाही. त्याप्रमाणे जबरी न करणारास सत्यवर्तन करणारे म्हणावे.

'अखंड ' या काव्यप्रकारात त्यांनी 'मानवाचा धर्म' आत्मपरिक्षण,नीती, समाधान, सहिष्णुता, सदसदविवेक, उद्योग, स्वच्छता, गृहकार्यदक्षता इत्यादी गोष्टीवरही भाष्य केले आहे. ज्योतीबारावांनी वेगवेगळ्या अखंडातून जे विचार मांडले, मानवी जीवनाला दिशा देणारा जो उपदेश केला, त्यातील काही निवडक भाग येथे विचारात घेतला पाहिजे.

हे महात्मा ज्योतीराव फुले यांचे कार्य होय.

– गोंदकर श्वेता चांगदेव **(SYBA)**

## पर्यावरण रक्षण



**माणसाच्या कृतघ्नपणाचा**
**माणसलाच त्रास आहे**
**माणसाच्या अविचारीपणामुळेच**
**पर्यावरणाचा ऱ्हास आहे**
**पर्यावरण रक्षणाचा मंत्र**
**कानोकानी पोचवावा लागेल**
**स्वतःला वाचवायचे तर**
**निसर्ग वाचवावा लागेल.**

**धाडगे वैष्णवी (एस.वाय.बी. कॉम.)**

# बेटी बचाओ... बेटी पढाओ...

'बेटी बचाओ,बेटी पढाओ' आजच्या या युगात स्त्रियाना खूप महत्व दिले जाते. कारण एक स्त्री पुरुषाप्रमाणे आपले कार्य करु शकते.

आधुनिक काळात स्त्रियांना फारसे महत्व दिले जात नव्हते. त्यांना फक्त 'चूल आणि मूल' या दोन गोष्टीना महत्व होते. त्यांना समाजात वावरने खूप अवघड होते. त्या काळात त्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता पण एक स्त्री पुरुषाप्रमाणे आपले जीवन जगू शकते. आजच्या लोकांना असे वाटते की 'मुलगी ही परकियांची धन आहे ' परंतु मुलगी हीच दोन्ही कुटुंबाचा जयजयकार करत असते.

आज मुली या डॉक्टर, इंजिनिअर, वकील,पोलिस, शिक्षक, विमानचालक या सर्व क्षेत्रात आज पुरुषाप्रमाणे खांद्याला खांदा लावुन उभ्या आहेत. पण समाजातील लोक मुलगी व मुलगा यामध्ये फरक मानतात. मुलगी जन्माला येवू नये. म्हणून जन्माला येण्याच्या आत तिला मारुन टाकतात.समाजातील लोक मुलाला महत्त्व देतात. पण त्यांना हे माहित नसते कि.
'मुलगा जरी वंशाचा दिवा असला तरी मुलगी ही पणती असते. जी दोन्ही घरे उजेड बनविण्याचा प्रयत्न करत असते. मुलगी ही भविष्यात कुणाची आई , कुणाची बहीण, कुणाची पत्नी असते आपण तिचा आदर पाहिजे. तिला शिक्षित केले पाहिजे.

जर ती शिक्षित असेल तरच ती दोन्ही कुटुंबाना साक्षर करु शकते. त्यांना चांगल्या मार्गावर वाट दाखवू शकते. पण तिचा जर निरक्षर असेल तर ती कुटुंबाचा उध्दार करु शकत नाही.

म्हणून आपण 'मुलगी वाचवून तिला शिकवल पाहिजे. तिला सुशिक्षित बनवले पाहिजे.




कारण 'मुलगी असते एक धागा'
वातीला उजेड दाखवणारी
समईतील जागा
घर उजळतं तेव्हा नसतं भान
विझून गेली अंधारात की
सैरावैरा धावायलाही कमी पडतं रान.

**– वारुळे कांचन अशोक (F.Y.B.A.)**

# जलप्रदुषण



जलप्रदुषण म्हणजे पाण्याच्या स्त्रोतांचे प्रदुषण जलप्रदुषण ही एक मानव निर्मित समस्या आहे.पाण्यातून होणाऱ्या संसर्गामुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. विशेषतः पाच वर्षाच्या आतील मुले अशा संसर्गाला बळी पडतात. जगण्यासाठी सजीवांना पाण्याची अत्यंत गरज असते. जगात उपलब्ध असलेल्या पाण्यापैकी फक्त१ ते १.५% पाणीच पिण्यायोग्य आहे. कारण पृथ्वीवरील एकुण पाण्यापैकी जवळजवळ ९८% पाणी हे समुद्र आणि बर्फाच्या स्वरुपात आहे. त्यामुळे पिण्यायोग्य पाणी जपुन वापरणे गरजेचे तर आहेच आणि पिण्यायोग्य पाण्यात प्रदुषके मिसळल्यापासून थांबवणे सुद्धा गरजेचे आहे. जलप्रदुषण हे आपल्यासाठी खुप हानिकारक आहे.

**❊ जलप्रदुषणाची सामान्य कारणे –**

कचरा व समान यांचे वापर करणे अनेक कारणांव्दारे जलप्रदुषण होत असते. त्यामध्ये औद्योगिक रासायनिक पदार्थ पाण्यात सोडण्याने सांडपाणी, मैलपाणी, जलाशयात सोडल्याने रासायनिक खते,कीटकनाशके पाण्यात मिसळल्याने पाण्यातील जीव मृत होऊन कुजल्याने,कचरा किंवा तत्सम पदार्थ पाण्यात टाकल्याने, जनावरे, कपडे, भांडी नदीच्या ठिकाणी धुतल्याने , मृत जनावरे नदीत टाकल्याने रासायनिक रंगकाम केलेल्या आणि प्लास्टर ऑफ पॅरिस पासून बनविलेल्या मूर्तीच्या विसर्जनामुळे पाण्याचे प्रदुषण होते. अशी अनेक जलप्रदुषणाची कारणे आहेत.

जगभरातील साधारण २५ टक्के लोक संस्थेला पिण्याचे शुद्ध पाणी मिळू शकत नाही. पाण्याच्या शुध्दीकरणासाठी क्लोरीनचा वापर सर्वाधिक केला जातो पण त्यामुळे पाण्यातील सर्व प्रकारचे जंतु मरत नाही. त्यामुळे पाणी शुद्धीकरणासाठी शुद्धीकरणाच्या अन्य पध्दतींची गरज पडते. जलप्रदुषण थांबवण्यासाठी काही उपाययोजना करु शकतो. त्यात औद्योगिक घटकांना मार्गदर्शक सूचना करणे, रासायनिक पदार्थ पाण्यात टाकण्यापासून अटकाव करणे सेंद्रीय खत, शेतीचा वापर करणे, रासायनिक खते कीटकनाशके मर्यादीत वापरणे, शाडू मातीच्या मुर्ती आणि नैसर्गिक रंग वापरुन सणांचा सात्त्विक आनंद लुटणे. जलप्रदुषण करणे टाळणे, पाणी उकळवून आणि त्यामध्ये तुरटी फिरवुन पाणी पिणे कारखान्याचे दुषित पाणी प्रक्रिया करुन शुद्ध करुन नदीत सोडणे. अशुद्ध पाण्याची निर्मिती कमीतकमी प्रमाणात कशी होईल याची काळजी घेणे घरगुती अशुध्द पाणी योग्य ती प्रक्रिया करुनच नदीमध्ये सोडणे. मलनिः सारण प्रकल्प उभे करणे

जलप्रदुषणाला शहरीकरण आणि शहरातील अपुरे सांडपाणी व्यवस्थापन हे महत्वाचे कारण आहे. तसेच रोजच्या वापरातील शरीर स्वच्छता आणि घराची स्वच्छता यासाठी वापरण्यात येणारी रसायने यांचा महत्वाचा भाग आहे.या सर्व कारणामुळे जलप्रदुषण एक गंभीर समस्या बनली आहे पण जर त्यावर त्वरीत उपाययोजना केल्या तर ती आटोक्यात येऊ शकते.

# पाणी बचत काळाची गरज

पाणी बचत हा कळीचा मुद्दा बनलाय. सर्वत्र पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे.हंडाभर पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. खेड्यातील असो वा शहरातील प्रत्येक बायकांना या समस्येला सामोरे जावे लागत आहे. तासनतास् टँकरची वाट पाहत लांबलचक रांगेत तीव्र उन्हात उभे राहवे लागत आहे. या सर्व परिस्थितीने सामान्य माणूस हतबल झाला आहे. त्यामुळे या परिस्थितीशी सामना करण्यासाठी पाण्याचे कटाक्षाने नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे.

'पाण्याची बचत करा' हे ऐकून किंवा बोलून चालत नाही. तर ते प्रत्यक्षात आणावा लागेल. प्रत्येकाला पाणी बचत ही सवय बनवावी लागेल तरच हे शक्य आहे.गावागावात महिला पाण्यासाठी वनवन भटकताना दिसून येत आहे. एका टँकरचे पाणी घेण्यासाठी नागरिकांची झुंबड उडते आहे. शेतकरी उजाड झालेल्या शेताकडे पाहून खिन्न झाल्याचे चित्र दिसते. असंख्य पक्षी व प्राण्यांची पाण्यावाचून तडफड सुरु झाली आहे. अशा वातावरणात जेथे पाण्याची परिस्थिती बरी आहे. तेथील नागरिकांनी पाण्याची बचत करणे गरजेचे आहे. या परिस्थितीत धुलिवंदनाला लाखो लिटर पाणी वाया घालू नये, रंग खेळणे आपली संस्कृती आहे. परंतु आजची परिस्थिती मात्र वेगळी आहे. पाण्याचा अपव्यय न करता यंदा धुलिवंदन, रंगपंचमीला फक्त रंगाचा टिळा लावून होळीचा आनंद घ्यावा.अपायकारक रासायनिक रंगापासूनही दूर राहिले पाहिजे.

सर्व सजीव सृष्टीला पाण्याची आवश्यकता आहे. पाणी हे जीवन आहे. तसेच ते अमूल्य आहे दरवर्षी पाऊस कमी पडतो आणि उन्हाळ्यात



आपल्या तोंडचे पाणी पळायची वेळ येते. अशी आणीबाणीची वेळच येऊ नये. यासाठी आपणच कार्य करण्याची गरज आहे. जे करायचे ते फक्त या वर्षापुरतेच करुन नाही चालणार , तो आपल्या सवयीचा भाग बनला पाहिजे.

पाणी बचत करणारी कित्येक उपकरणं बाजारात आलेली आहेत. त्याचा वापर करा. तुम्ही एसीचा वापर करत असाल तर त्याचे तापमान २४ अंशसेल्सियस म्हणजे त्यातून पाणी बाहेर पडेल शक्य असल्यास पंखे आणि नैसर्गिक हवेचा वापर करा.

**– कर्डिले प्रमिला महादेव (S.Y. B.Sc.)**

# संगणक काळाजी गरज




संगणक काळाची गरज बनली आहे ... संगणकाचे ज्ञान असणे ही काळाची गरज बनली आहे ! २१ वे शतक हे तंत्रज्ञानाचे शतक मानले गेले आहे! संगणक ही तंत्रज्ञानाचा एक अविष्कार आहे! आज प्रत्येक क्षेत्रात संगणकाचा मुक्त वापर होतांना दिसतो. संगणकाच्या वापरामुळे अनेक अवघड आणि वेळखाऊ कामे सुलभ झाली आहेत ! आपल्या दैनंदिन व्यवहारात, रिजर्वेशन, हॉस्पिटल शाळा, बँका, हॉटेल्स, व्यापारी प्रतिष्ठाने, कारखाने सेवा क्षेत्र, कृषी क्षेत्र, रुग्णालये, सरकारी-खाजगी कार्यालये सगळीकडे संगणकाचा वापर केला जातो. बऱ्याचदा आपल्याला हवी असलेली माहिती व कागदपत्रे संबंधित कार्यालयात व्यक्तीशः न जाता इंटरनेटच्या माध्यमातून संगणकावर सहज उपलब्ध होतात. परिक्षेचे व नोकरीचे अर्ज भरण्यापासून त्याच्या निकालापर्यंत सर्व गोष्टी इंटरनेटवर उपलब्ध होत असतात. त्याकरिता संगणकाचे शिक्षण घेणे अतिशय महत्वाचे आहे. पूर्वी ज्याला संगणक वापरता येत नाही. त्याला निरक्षर मानले जायचे. आता मात्र ज्याला संगणक वापरता येतो त्याला साक्षर मानले जाते.

व्यवसाय वा नोकरी म्हणून निवड केलेले कित्येक लोक कमालीचे यशस्वी झालेले आढळतात. अनेकांनी देशविदेशात'तगड्या' पगाराच्या नोकऱ्या देखील मिळवल्या आहेत. म्हणूनच संगणकाचे ज्ञान असणे ही काळाची गरज बनली आहे. इंटरनेट तंत्रज्ञानामुळे माहितीचे देवाण-घेवाण करणे अत्यंत सोयीचे झाले आहे. विविध विषयांचा संबंधित संकेतस्थळे संगणकावर उपलब्ध झाल्याने विविध विषयाचे अद्ययावत माहिती मिळविणे शक्य झाले आहे. या एकविसाव्या शतकाने आपल्याकडे माहितीचे युग आणले संगणक आणि इंटरनेट यांनी आपल्या आयुष्यात लक्षणीय बदल घडवून आणून माहितीचे काम,नोकरी व्यवसायात करमणूक आणि संदेश वहन यांची नेहमी यंत्रे उघड आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची साक्षरता किंवा संगणकांची साक्षरता ज्ञानाच्या क्षेत्रात टिकुन राहते. आणि व्यवसाय कारकिर्दीच्या वर्गावर प्रगती करणे अत्यावश्यक बनले आहे. सध्याच्या विज्ञान युगात कायम संशोधन चालू असते. या संशोधनात संगणक मोठे सहाय्य करतो. या युगतील अंतराल विज्ञानाला संगणकाचा आधार लाभला आहे. अंतराळ उपग्रह सोडविण्यासाठी संगणकामुळे शक्य झाले आहे. हवामानाचे अंदाज, दूरदर्शनवरील चित्रदर्शन अशी कितीकाने सांगावे . या संगणकाची इंटरनेटच्या चमत्काराने तर जग जवळ आणण्यात मदत होईल.

– **फाटक ऋतुजा अनिल** (S.Y.Bsc)

# भारतीय आयुर्वेद एक वरदान

आयुर्वेद हा संस्कृत भाषेतील शब्द असून त्याचा संधीविग्रह (आयु)जीवन + विद्या (वेद) अशाप्रकारे होतो. आयुर्वेदाची सुरुवात ब्रह्मापासुन झाली असे मानले जाते. आयुर्वेद आणि त्यासारख्या विद्याशाखांमधून भारतात प्राचीन काळापासून असलेल्या वैद्यकीय ज्ञानाची कल्पना येते. आयुर्वेदाला सुमारे ३,००० वर्षापासून चालत आलेली व्यापक आणि उत्तुंग परंपरा आहे. आयुर्वेदातील पध्दतीमध्ये वनौषधी, वनस्पतीजन्य औषधी, आहार विषयक नियम, व्यायामांचे विविध प्रकार व त्याद्वारे शरीरातील नैसर्गिक प्रतिकार शक्तीत वाढविण्यावर भर दिला जातो.

आयुर्वेदातील काही वनस्पती औषधांचे संदर्भ हे मुख्य चार वेदांपैकी एक असलेल्या अर्थवेद या इसवी सनपूर्व सुमारे १२०० मध्ये रचल्या गेलेल्या वेदामधुन घेतले आहेत.अर्थवेदात आयुर्वेद शास्त्राचे अधिक वर्णन आहे. म्हणून आयुर्वेदाला अर्थवेदाचा उपवेद मानतात. त्यामुळे आयुर्वेद हा अर्थवेदाचा एक घटक समजला जातो. गौतम बुध्दाच्या आणि त्यानंतरच्या काळात आयुर्वेदामध्ये अनेक मोलाच्या गोष्टींची भर घालण्यात आली. समुद्रमंथनातून निघालेले भगवान धन्वंतरी हे आयुर्वेदातील परंपरेनुसार आद्य वैद्य मानले जातात. आयुर्वेद हे प्राचीनतम शास्त्र असुनही आजच्या युगातही या शास्त्राच्या सिध्दातांवर आधारित चिकीत्सा उपयुक्त यशस्वी ठरते.

आयुर्वेदातील विविध परंपरांनी सुमारे १२०० वर्षांचा काळ व्यापलेला आहे. गौतम बुध्दाच्या काळापासून (सुमारे इसवी सनपूर्व ५५६) ते सम्राट हर्षवर्धनाच्या काळापर्यंत (सुमारे इ.स. ६००) या परंपरांचे कार्य चालत होते. पण तीन शाखांचे औपचारिक सिध्दांन्त आणि युक्त्या मूळ बौध्द साहित्यात दिसून येतात. चरक व सुश्रूत संहिताचे बऱ्याच लोकांनी संपादन केले आहे. अनेक शतकानंतर त्यांच्यामध्ये अगणित आवर्तने झाली आहेत.

इसवी सनाच्या सातव्या शतकात सिंध प्रातांत राहणाऱ्या वाग्भट यांनी सुरुवातीच्या आयुर्वेदीक साहित्यांचे एकत्रिकरण केले आहे. त्याला अष्टांग हृदय असे म्हणतात. चरक सुश्रूत व वाग्भट यांचे काम आयुर्वेदाचा मूळ आधार समजले जाते. म्हणून या तिघांना आदराने बृहद त्रयी नावाने ओळखले जाते. त्यानंतर





आठव्या शतकात वैद्य माधव ऋषि यांनी ‘निदान’ हा ग्रंथ लिहिला.

आयुर्वेदात मुख्यतः वनस्पती व त्याचे वेगवेगळे भाग यांच्यापासुन तयार झालेली औषधे वापरतात. पहिल्या सहस्त्रकानंतर रासायनिक औषधेही थोड्या प्रमाणात वापरली जातात. इ.स.च्या आठव्या शतकात उग्रदिव्य आणि इ.स. च्या चौदाव्या शतकात सरनगध यांनी बऱ्याच रासायनिक औषधांचा अभ्यास केला. विंचू, साप, कोळी इ. प्राण्याच्या विषांचाही प्राणिज औषध म्हणून वापर केला जातो विषौषधाचा अभ्यास करणारी अगदतंत्र ही आयुर्वेदाची एक शाखा आहे.

आयुर्वेदाच्या प्राचीन ग्रंथात केवळ आहाराचाच विचार केला जातो. नाही तर विविध ऋतुमध्ये, कालानुरुप हवा पाण्यात बदल होत असतांना आपण कसे रहावे, कसे राहू नये, याचा साधक –बाधक विचार केलेला आहे. तर या ग्रंथ व पोथ्यांमध्ये अगदी सर्वसामान्य विकारांपासून दुर्मिळ विकारांवर मात्रा आहेत. आयुर्वेदाच्या दुर्मिळ पोथ्यांचे संग्रहन अनेकांनी केले आहे. नाशिकचे वैद्य हे त्यापैकी एक आहेत.

आयुर्वेदामध्ये संशोधनाची गरज असून जगात अनेक ठिकाणी त्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. आयुर्वेदात संशोधन करण्याचे अनेक प्रयत्न व मार्ग आहेत. क्लिनिकल ट्रायल हा त्यापैकी एक महत्वाचा मार्ग आहेत. आयुर्वेदिक सिध्दान्त तपासून पहाणेही एक प्रकारचे संशोधन आहे. प्राचीन सांख्यदर्शन या दर्शन शास्त्रावर आयुर्वेद आधारलेला आहे. त्यात सर्व भौतिक जग हे पाच मूळ तत्त्वांपासून तयार झाले आहे असे मानले जाते. त्यातील प्रत्येक मूळ तत्त्वांचे स्वतःचे काही गुण आहेत. ही मूळ तत्वे खालीलप्रमाणे आहेत.
आकाश, वायू,अग्नी, पाणि, पृथ्वी


**– चेमटे शिवाजी सुनिल** (F.Y.Bsc)

जल म्हणजे जीवन याशिवाय जिवंत राहणे अशक्य आहे. २२ मार्च हा जागतिक जलदिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाचा हेतू जलसंकटावर मात व जलसंवर्धन महत्व समाजापर्यंत पोहचविणे आहे. अनियमित पर्जन्यमान व जमिनीतील खालावणारी पाणीपातळी ही भविष्यातील संकटाची चाहूल आहे. पावसाचे पाणी अडविणे ही काळाची गरज आहे. पाणी संकटातून मार्ग काढण्यासाठी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक बनले आहे. शेती व मानवी जीवनात पाणी महत्तव अनन्यसाधारण आहे. पाणी बचत व जलसंवर्धन करण्याच्या कामात सर्व घटकांनी सहभागी झाले पाहिजे.

विकासाच्या वाटेवर वाटचाल करताना निसर्गाकडून मिळणाऱ्या जलसंपत्तीचे रक्षण करणे महत्वाचे आहे.

जलसाक्षरतेसाठी शासनाने स्वयंसेवी संस्थांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी, विद्यार्थ्यांनी हातात हात देऊन एकत्रितपणे कार्य करत राहिले पाहिजे. जलजागृतीमुळे लोकांची पाण्याविषयी दृष्टी बदलून पाण्याचे महत्व समस्त नागरिकांना कळणार आहे. पाण्याचे थेंबा–थेंबाचे नियोजन करण्यासाठी सामुहिक प्रयत्नातुन मानसिकतेत व वर्तनात बदल होणार आहे. निसर्गचक्र जपण्यासाठी प्रत्येकाने पाण्याचा अतिरिक्त वापर टाळून पाण्याची बचत केल्यास पुढच्या पिढीस पाणी टंचाईची झळ बसणार नाही. गावागावात महिला पाण्यासाठी वणवण भटकतांना दिसुन येत आहेत असंख्य पक्षी व प्राण्यांची पाण्यावाचून तडफड सुरु झाली आहे.

देशातील विविध भागात भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. यामागील कारण म्हणजे, पाण्याचा होणारा दुरुपयोग होय. तसेच जलसंवर्धनाकडे



होणारे दुर्लक्ष होय. पृथ्वीवर मुबलक प्रमाणात जलसाठा उपलब्ध आहे. परंतु पिण्यायोग्य पाणी फारच कमी आहे. जलसंकटार मात करण्यासाठी शासनामार्फत 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून 'जलयुक्त शिवार अभियान' योजना राबविण्यात येत आहे.

पाण्याचे संकट टाळण्यासाठी पाण्याचा कमीत कमी वापर , पाणी वापराचे योग्य नियोजन, व विहीरी यांचे पाणी दूषित होणारे नाही, याची काळजी घेतली पाहिजे. काही ठिकाणी पाईपलाईन द्वारे सोडलेल्या पाण्याची सतत गळती होत असते, त्या ठिकाणांचा शोध घेऊन लवकरात लवकर दुरुस्ती केली पाहिजे. वृक्षतोड ही मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे निसर्गावर त्याचा परिणाम होत आहे. वृक्षतोड थांबवून वृक्षारोपणाचे काम हाती घेतले पाहिजे पावसाचे प्रमाण कमी होण्याचे कारण वृक्षतोड आहे.

प्रत्येकाने जर पाण्याचा अतिरिक्त वापर टाळला व पाण्याचा काटकसरीने वापर केला तर निश्चितच पाण्याचे संकट कमी होईल.

**– विटकर आदित्य T.Y. B.sc (Chemistry)**

# अंतराळवीर कल्पना चावला



कल्पना चावला एक शूर, धाडसी आणि जिद्दी पहिली भारतीय अंतराळवीर महिला. हरियाणा राज्यातील कर्नाल नावाच्या गावातील बनारसीलाल आणि संयोगिता यांच कल्पना हे शेंडेफळ चार भावंडांमधील धाकटं भावडं एक जुलै १९६१ रोजी तिचा जन्म झाला. तिचे आई–वडील दोन्ही कुटुंबानी भारत–पाकिस्तान फाळणीचे चटके खाल्ले होते. चिकाटी जणूकाही कल्पनाच्या कुटुंबातच भिनली होती. कल्पनाचं बालपण अगदी छान गेलं लहान असल्यानं ती सगळ्यांचीच लाडकी होती.

ती मुलगी असल्यानं मात्र फ्लाईंग स्कूलमध्ये तिला प्रवेश नाकारण्यात आला पण हार मानेल ती मोंटू कसली ! एखादी गोष्ट पूर्ण करायची ठरवल्यावर ती करणारच! मोंटून स्वप्न बघितलं होतं वैमानिक व्हायचं ते ती पूर्ण करणारच होती. तो तिचा स्वभावच होता.

कॉलेजचं शिक्षण पूर्ण झाल्यावर तिला इंजिनिअर व्हायचं होतं तर तिच्या आई–वडिलांना तिला प्राध्यापिका किंवा डॉक्टर करायचं होत. कल्पना हट्टाला पेटली. इंजिनिअर व्हायचंय यासाठी शेवटी पालक तयार झाले. परीक्षेच्या रिझल्टमध्ये भरघोस गुण होतेच त्यामुळे चंदीगडच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये तिला सहज प्रवेश मिळाला. इथंही एरोनॉटिक्स विषय कॉलेजकडून तिला मिळाला नसता तर ती प्रवेश रद्द करणार होती. तिच्या जिद्दीमुळे तो तिला मिळाला, त्या विषयात अभ्यास करुन विद्यापीठात पहिली येणारी ती एकमेव विद्यार्थिनी होती. कॉलेजनं तिला नोकरी देऊ केली पण कल्पनाला अवकाश खुणावत होतं ती स्वप्नाच्या दिशेनं आणखी एक पाऊल पुढे सरकली. यावेळी शिडी होती अमेरिकेतील उच्च शिक्षणाची अमेरिकेतील टेक्सास विद्यापीठात एरोनॅटिक्समध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी तिची निवड झाली. अर्थात याही वेळी घरच्यांच्या दबावाला न जुमानत कल्पना अमेरिकेत गेली. अमेरिकेत अभ्यासासोबत तिनं विमान चालवण्याचं प्रशिक्षण घेतलं जोडीला समुद्रातील स्कुबा ड्रायव्हींग शिकली. हे सगळं शिकवणारा तिचा प्रशिक्षक जीन पियर हॅरिसन यांच्याशीच तिनं पुढं लग्न केलं.

यानंतर तिची कोलंबिया अवकाश मोहिमेवर निवड झाली. स्वप्न अगदी डोळ्यांच्या पापण्यांशी येऊन थांबलं होतं हे स्वप्न सत्यात उतरलं १९ नोव्हेंबर १९९७ रोजी कल्पनासह सहा अंतराळवीरांनी अवकाशात उड्डाण केलं. ते सोळा दिवसांसाठी छोटे–मोठे प्रयोग अवकाशात त्यांनी केले. एक उपग्रह अवकाशात सोडला. कल्पनानं अभिमानानं आपल्या सहकाऱ्यांना हिमालय दाखवला दिल्ली–कर्नाटक दाखवलं भारताचे तत्कालीन पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांच्याशी ती फोनवरुन बोलली. या सोळा दिवसात यानानं पृथ्वीभोवती दोनशे बावन्न फेऱ्या मारल्या आणि सुमारे एक कोटी किलोमीटर अंतरप्रवास करुन साहासी अंतराळवीर कल्पना चावला पृथ्वीवर परतली आणि २००३ च्या अवकाश मोहिमेकरिता पुन्हा एकदा तिची निवड झाली. यावेळी ती फ्लाईट इंजिनिअर होती. अनेक प्रयोग त्यांनी यावेळी अवकाशयानात केले. सोबत गाणी गप्पा, पृथ्वीचे विहंगम दर्शन, भारताचा झेंडा, कॉलेजच्या आठवणी या सगळ्यात कल्पना खुश होती. ही अवकाश मोहिम यशस्वी व्हायच्या बेतातच होती. कारण सर्व प्रयोग करुन ठरवलेली काम पूर्ण करुन १ फेब्रुवारी २००३ रोजी यान पृथ्वीकड परतीच्या प्रवासता होतं. यानाचा वेग अति प्रचंड असल्यामुळे खूप काळजीपूर्वक पृथ्वीभोवतालचे हवेचे संरक्षक आवरण भेदावे लागते.

जगाच्या इतिहासानं कल्पना चावलाची नोंद घेतली स्वप्नांचा मार्ग सत्यातून जातो हे कल्पनानं दाखवून दिलं यशाच्या शिखरावर पोहोचयाचे असेल तर निष्ठेनं हाती घेतलेलं काम पूर्ण कराव हा संदेश कल्पना चावला देते.

**– तेलधुणे एलिझाबेथ योसेफ**
**T.Y.B.sc (Chemistry)**

# आजचे राजकारण आणि तरुण




राजकारण म्हटले की आजकालचा तो भाऊ दादा आणि पुष्कळशा मोठमोठ्या उपाध्या, त्याच्याही पुढे जाऊन मात्र या युवकांनी आपले भविष्यातील राजकारण विषयांची स्वप्ने देखील काबीज केली आहेत. ''नाव मोठ नी लक्षण खोटं''असे महापराक्रमी निष्फळ कामाचे जनक असलेले आजच्या या २१ व्या शतकातील तरुण आता म्हणलं की, निश्चितच गल्लीतल्या सार्वजनिक गणपती उत्सवापासून सुरु झालेला प्रवास, तरुण म्हणलं की सळसळत रक्त, अंगात जोश, आणि ताकद ''लाथ मारील तिथे पाणी काढील''असेही बरेच काही व्यक्तिमत्व बघायला मिळतात परंतु गव्हाबरोबर किडेही रगडले जातात तसाच काहीसा प्रकार आज आपणा सर्वांना सर्रास पाहावयास मिळतोय.

खरंच आजच्या या विषयाच्या माध्यमातून जनसामान्यातील सर्व तरुण वर्गाला विचार करायला भाग पाडणारा प्रश्न उपस्थित झालाय जे आपले पाऊल भविष्यात राजकारणाकडे वळवताना दिसताहेत. पूर्वकाळाच्या राजकारणात जी ताकत नेते मंडळीमध्ये होती ती आज लोप पावताना दिसतेय. निवडणुकांवर उधळला जाणारा पैसा आज सर्वात मोठा प्रश्न आहे. आजच्या काळातील तरुण त्याचा स्वतःचा आत्मविकास , सामाजिक विकास, मूलभूत गरजा, सोयीसुविधा वगळून स्वतःबरोबर स्पर्धा करायची सोडून ती जगातील इतर लोकांशी स्पर्धा करतोय परंतू ती त्यांच्या चैनीच्या वस्तूंशी

अगदी पहाटेच्या साखर झोपेत स्वप्न बघावं आणि कुणीही उठून राजकारणात यावं असाच काहीसा प्रकार आज आपल्या समोर घडतोय. या २१ व्या शतकातील तरुणांना काही लोकांनी आपला प्रतिनिधी म्हणून कुठेतरी स्थान घ्यावे आणि याने लगेच दुसऱ्या दिवशीपासून पांढऱ्या शुभ्र खादीचा शर्ट आणि पायजमा घालावे असे आमचे भावी नवतरुण राजकारणी

आजचा तरुण जनहिताची कामे कमी आणि स्वतःची वाहवा करण्यात व्यस्त आहेत. आपल्याच घरातील जर कुणी राजकारणात चांगल्या प्रतिष्ठित ठिकाणी असेल तर मग मात्र सोन्याहून पिवळं या राजकारणातील तरुण राजकारण्यांच्या घरात जन्माला आला म्हणजे त्याचे भाग्यचं

थोर मंडळीच्या राजकारणातील सल्ला म्हणजे यांना यांचा अपमान किंवा कमीपणा वाटतो. सद्यस्थितीतील तरुण या राजकारणाच्या भांड्यात एवढा गुरफटून गेलाय कि त्याला कुठल्या झेंड्याचा आधार घ्यावा हेच कळत नाहीये. आपल्या आत्मविकासाबरोबर समाजकारण, समाजाच्या हिताच्या गोष्टी, शिक्षण, आरोग्य, नोकरी , व्यवसाय या सगळ्या प्रश्नांवर अभ्यास करुन त्या कशा प्रकारे सोडवाव्यात. हे सगळे सोडून तो आपल्याला स्वतःच्या भल्यासाठी जनतेचा कशा प्रकारे वापर करुन घेता येईल, त्यांना त्याच्या एकीचे महत्व न सांगता आंदोलने , हिंसाचार, दंगली या सगळ्यांमध्ये गुरफटून टाकतोय.

राजकारणात आपले भविष्य पाहणारा तरुण आत्ताच काही उणाडक्या करणाऱ्या तरुणांचा आधार घेऊन जर 'भावी आमदार' ची स्वप्न पाहत असेल तर काय होईल राजकारणाचे शेवटी मग पुढारपणा करण्यातच मग त्यांचे सगळे आयुष्य निघून जायचे आणि पक्षांतर करुन आपले स्वतःचे पोट कसंतरी भरवायचे एवढेच दिसून येते.

**– कुणाल बाळासाहेब बनकर (S.Y. Bsc.)**

# विज्ञान वरदान की शाप

२१ व्या शतकामध्ये विज्ञान हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. आज विज्ञानाशिवाय जगणे अशक्य बनले आहे. मानवी जीवनाचा प्रत्येक भाग हा विज्ञानाशी जोडला गेलेला आहे. त्यामुळे विज्ञान हा माणसासही शाप की वरदान आहे हे ठरवणे खूप कठीण आहे.

तर सर्वात आधी विज्ञानाची खरी व्याख्या काय आहे. हे जाणणे जरुरी आहे वेन्सटट शब्दकोशानुसार ''विज्ञान म्हणजे अभ्यास अशी आहे की नैसर्गिक जग आणि त्यामधील प्रक्रियांचा सखोल आणि व्यवस्थित अभ्यास म्हणजे विज्ञान होय.

तर मग विज्ञान हा माणसासाठी शाप किंवा वरदान आहे हे ठरणार कसे ? तर तसेच विज्ञानाचे फायदे आहेत. माणसांच्या उत्क्रांतीमध्ये विज्ञानाचा खूप मोठा हात आहे.आज आपण आपल्या आजूबाजूला ज्या गोष्टी बघतो. त्या विज्ञानाची देणगी आहे.

आपल्या घरातील टी.व्ही. आपण ज्या बस ने प्रवास करतो त्यापासून आपल्या हातातील मोबाईल हे सगळे विज्ञानामुळे शक्य झाले आहे. हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे शोध आहे. विज्ञानाने त्याच्या चेहऱ्यावर अनेक अद्भूत शोध आणि शोधांसह पृथ्वीचा चेहरा बदलला आहे. आपल्या पूर्वजांपैकी एकाने पृथ्वीला परत येण्याची इच्छा असेल तर ते तो ओळखू शकणार नाही. त्यामुळे प्रचंड आणि मूलभूत बदल झाले आहेत



विज्ञानाने त्याच्या अद्भूत प्रगती आणि विकासाव्दारे अभूतपूर्वपणे मानवजातीला फायदा झाला आहे आणि तरीही विकास आणि शोध फार जलद मार्गावर चालत आहेत. हे मूलभूत स्वभावाचे आणि दूरगामी परिणाम आहेत, इतके जेणे करून जगाला अनावश्यकपणे बदल करता येणार नाही.

मनुष्याला अधिक सुरक्षित आरामदायी आणि महत्वाचे वाटते. आजच्यापेक्षा वैज्ञानिक विकासामुळे आणि प्रगतीमुळे जेव्हा आपण चंद्र आणि ग्रहांवर वसाहती करू ते दिवस दूर नाही विज्ञानाने बरेच आणि अधिक मिळविण्याचे आश्वासन दिले आहे. विज्ञानाने निसर्गाची शक्ती, जिंकलेली जागा, वेळ, दैनंदिन जीवनास प्राणघातक रोग, अन्न कपडे इत्यादींचा पाठपुरावा केला आहे.

**- छात्रेकर रिया राजू (F.Y.Bsc.)**

# पाणी बचत काळाची गरज



जल है तो जीवन है
जीवन है तो पर्यावरण है,
पर्यावरण से ये धरती है,
और इस धरती से हम सब है ...

दरवर्षी २२ मार्चला जागतिक 'जलदिन' साजरा केला जातो. मनुष्यप्राण्याच्या जीवनात पाण्याला असलेले अनन्यसाधारण महत्त्व पाहून पाण्याला जीवन असेही म्हटले जाते पृथ्वीचा तीन – चतुर्थांश भाग पाण्याने वेढलेला आहे. तथापि हे पाणी खारे असल्याने पिण्यास लायक नाही आपल्या देशातील उपलब्ध पाणी साठ्याचे प्रमाण विषम स्वरुपात आहे वाढती लोकसंख्या, पाण्याची भू–गर्भातील घटणारी पातळी यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची गरज आहे. आणि त्यासाठी जलसाक्षरतेची गरज आहे.

थेंब थेंब वाचवू पाणी आनंद येईल जीवनी ... पाणी समस्या ही फक्त एका जिल्ह्याची, राज्याची किंवा देशाची समस्या राहिली नाही तर तिला जागतिक स्वरुप प्राप्त झाले आहे. पृथ्वीवर भरपूर पाणी साठा आहे. तो कधीही कमी पडणार नाही असे सर्वांना वाटत होते. परंतु जसजसा औद्यागिक विकास होऊ लागला वाढत्या लोकसंख्येकडून पाण्याचा वापर वाढू लागला. तसतसा मुबलक पाण्याबाबतचा समज दूर होऊ लागला. तसे पाहिले तर पाण्याचा सर्वाधिक वापर शेती साठी केला जातो. त्यानंतर कारखाने आणि घरगुती वापरासाठी होतो. जलविद्युत प्रकल्प, औष्णिक विज प्रकल्पांनाही मोठ्या प्रमाणात पाणी लागत असते. आपल्या राज्यांचा विचार केला तर एकुण पावसाचे प्रमाण पुरेसे आहे पण विभागनिहाय विचार केला तर त्यात समानता नाही. पावसाळ्यात पडणारे पाणी साठवून ते अधिकाधिक क्षेत्राला पुरवता आले पाहिजे. आपल्याला अजूनही पाण्याचे महत्व म्हणावे तसे पटलेले दिसत नाही.

'आता राबवू जलनीती
नको दुष्काळाची भीती'

छोट्या छोट्या गोष्टींतूनही आपण पाण्याची बचत करु शकतो. पाण्याची बचत म्हणजेच पाण्याची निर्मिती असे म्हटल्यास वावगे ठरु नये. आपण रस्त्याने जातांना नळाच्या तोट्या उघड्या असलेल्या पाहतो त्यातूनही बऱ्याजदा पाणी वायाला जाते. शालेय महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांना पाणी बचती बाबतचे जल साक्षरतेचे धडे दिले गले पाहिजेत पाण्याचे महत्व समाजाला पटवून देण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभाग, जलसंपदा विभाग, कृषी , पशु संवर्धन दुग्ध व मत्स व्यवसाय विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता उद्योग विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग आदी प्रयत्नशील आहेत. या जलजागृतीसाठी स्वयंसेवी संस्थांनीही पुढे आले पाहिजे. पाणी बचत, जल साक्षरता, जलजागृती या गोष्टी केवळ कायदे किंवा नियमांनी साध्य होणाऱ्या नाहीत तर त्यासाठी हवी स्वयंशिस्त आणि जाणीव जागृती शाळेत फक्त पाण्याचा फॉर्म्युला **water = H2O** लक्षात ठेवलात त्याचे संवर्धन करायला कधी शिकणार ? विसरु नका. पाणी वाचलं तर आपण वाचू...

**– वाघुले अश्विनी भिमाजी (T.Y. B. Sc.)**

# *APJ Abdul Kalam (The missile Man)*



*Abdul kalam was an Indian Tamil politician and aerospace scientist who served as the 11th President of India from 2002 to 2007. He was born and raised in Rameshwaram , Tamilnadu studied physics and aerospace engineering. He spent the next Science administrator mainly at the Defence Research and Development Organisation (DRDO) and Indain Space Reserach Organisation (ISRO) and was intimately involved in India's Civilian Space programme and military missile development efforts He thus come to be known as Missile Man of India for his work on the development of ballistic missile and launch vehicle technology. He also played a pivotal organisational technical and pollitical role in India's Pokhran-II nuclear tests in 1998 the first since the original nuclear test by India in 1974.*

*After graduating from the Madras Institute of Technology in 1960, Kalam Joined the Aeronautical Development Establishment of the Defence Research and Development Service (DRDS) He started his career by designing a small hovercraft but remained unconvinced by his choice of a job at DRDO In 1963 to 1964, he visited NASA's Langley Research Center in Hampto Virginia, Goddard Space Flight Center in Green be it Maryland and wallops flight facility.*

*on 30 July 2015, the former president was laid to rest at Rameswaram's pei karumbu Ground with full state honours. over 3,50,000 people attended the last rites, including the Prime Minister, the governor or Tamilnadu and the chief Ministers of Karnataka , Kerala and Andra Pradesh. Books of Abdul Kalam.*

*1) India 2020 -A Vision for new millenium by APJ Abdul Kalam , Y.S. Rajan New York 1998.*

*2) Wings of fire - An Autobiography by APJ Abdul Kalam Arun Tiwari is Universities Press, 1999*

*3) Ignited Minda.*

***- Talekar Renuka Janardan***

***(S.Y. Bsc.)***

# सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य



**✻ सावित्रीबाई जोतीराव फुले जन्म –** नायगाव, खंडाळा, तालुका, सातार, जिल्हा ३ जानेवारी, १८३१ मृत्यू, पुणे १० मार्च ,इ.स. १८९७) या मराठी शिक्षिका समाजसुधारक होत्या महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात त्यांचे पती ज्योतीराव फुले यांच्यासह त्यांनी मोठी कामगिरी बजावली.

देशविदेशात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र म्हणून पुर्वेकडील ऑक्सफर्ड असा नाव लौकिक मिळवलेल्या पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे करण्यात आले. हा शहराच्या दृष्टीने ऐतिहासिक क्षण एकोणिसाव्या शतकातील प्रमुख शिक्षण तज्ञ सावित्रीबाई फुले यांचे नाव या विद्यापीठाला देवून विद्यापीठाचे अधिकार मंडळ आणि राज्य शासन यांनी स्त्रीशिक्षण ज्ञाननिर्मिती आणि दलित–बहुजन वर्गाच्या मानवी हक्काचा सन्मान केलेला आहे. आजवर त्याची ओळख प्रामुख्याने महात्मा ज्योतीराव फुले यांच्या पत्नी आणि सहकारी अशी झालेली आहे ती अपुरी आहे सुरुवातीला जोतीरावांची विद्यार्थिनी, पुढे कवियित्री, शिक्षिका, मुख्याध्यापिका, नेता, शिक्षणतज्ञ, विचारवंत असा त्यांचा झालेला विकास आणि प्रवास मनोज्ञ आहे.

शाळेतील सर्व मुलामुलींना जीवनात पुढे स्वतंत्र आणि स्वावलंबी होता यावे मजेत जगता यावे यासाठी उद्योगाचे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्याच्या देय त्यांच्याकडे होता.

"Industrial Departments should be attached to the schools in which children would learn useful trades and crafts and be able on leaving school to maintain themselves comfortably and independently ."

आजच्या काळात त्यांचा हा द्रष्टेपणा पाहून थक्क व्हायला होते, निरक्षर पालक हा शिक्षणातला मोठा अडथळा असतो हे ओळखून स्वतःच्या घरात सावित्रीबाईंनी १८५४ साली प्रौढ स्त्रियांसाठी रात्रशाळा सुरु केल्याची माहिती खुद्द जोतीरावांनी दिलेली आहे. सावित्रीबाईच्या नावाने ओळखले जाणारे हे विद्यापीठ ज्ञाननिर्मिती, स्त्रीपुरुष, समता, जातीनिर्मुलन संसाधनाचे फेरवाटप, सामाजिक न्याय आणि धर्म चिकित्सा याचे केंद्र बनावे अशी अपेक्षा आहे.

**✻ सावित्रीबाई फुले यांचे योगदान –**

✻ मुलींसाठी व अस्पृश्यांसाठी शाळा चालू करणारे पहिले भारतीय फुले दाम्पत्य होय या प्रकारे त्यांनी शिक्षणात नवे पर्व सुरु केले.

✻ सर्व शैक्षणिक कार्य विनामूल्य करणाऱ्या पहिल्या अध्यापिका

✻ शिक्षणामध्ये शारीरिक शिक्षणाचा अंतर्भाव करणाऱ्या पहिल्या अध्यापिका.

✻ त्यांनी पहिले अध्यापक प्रशिक्षण केंद्र ''नॉर्मल स्कूल'' काढले व चालवले होते.

✻ विद्यार्थ्यांना गणवेश पुरविणाऱ्या पहिल्या संचालिका सत्यशोधक समाजाच्या पहिल्या महिला अध्यक्ष.

✻ १८९६ साली दुष्काळात पोटासाठी शरीर विक्रय करणाऱ्या बापांना दुष्टाच्या तावडीतून सोडवून सावित्रीबाई त्यांना सत्यशोधक कुटुंबात आश्रयास पाठविले.

✻ रोटीबंदीच्या काळात सर्व जातीय महिलांचे तीळ-गुळासारखे मोठमोठे मेळावे घेणाऱ्या पहिल्या जाती, निर्मूलक.

✻ पुणे व आजूबाजूच्या १८ शाळांचे संचालन करणाऱ्या पहिल्या संचालिका.

✻ सह-शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या पहिल्या शिक्षण -तज्ञ त्यासाठी वेताळ-पेठेत सह-शिक्षण देणारी शाळा काढली. पण विवाहित महिलांनी मुलांसोबत बसण्यास नकार दिल्याने मुलांची अशा दोन शाळा केल्या.

✻ शालेय विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी त्यांना विद्यावेतन (स्कॉलरशिप) देणे सुरु करणाऱ्या पहिल्या अध्यापिका

**- भगत जयश्री गजानन (एस.वाय. बी. ए.)**



# अजून गविला नाही...

किती पुजला देव तरी
देव अजून पावला नाही
कुठं राहतो गावला नाही
अजून पर्यंत गावला नाही
मंदिरा म्होरं लुटली इज्जत
हा बघत बसला पोरीला
रक्षण करतो म्हणाला
अन स्वतःच गेला चोरीला
हातात असून धारदार शस्त्र
कधी चोरा मागे धावे नाही
सगळं काही तोच देतो
तोच पुरवितो सगळ्यांची हौस
शेतकरी बघतो आभाळाकडं
मग गेला कुठं पाऊस
लय केलं हरी हरी लय केलं
तरी मुखात कधी मावला नाही
कधी स्वतः हा राहून उपाशी
भूक त्याची भागिवली
हा म्हण निवदावर थोडी
साखर का नाही मागविली
आहार त्याचा वाढतच गेला
कधी एका बकऱ्यावर भागला नाही
अंधोळ करतो दुधाने जणू
सगळ्याच गाी ह्याच्या बापाच्या
तोच घागरी भरतो म्हणं
पुण्य अन पापाच्या
पाप पुण्याचा हिशोब
त्याने कधी दावला नाही
अन कुठं राहतो कोणास ठाऊक
अजून पर्यंत गावला नाही.

- पाखरे कृष्णा राजु

# नोट बंदी फायदे की तोटे

नोटबंदी म्हणजे चलनात असणाऱ्या नोटा ठराविक कालावधीनंतर चलन बाह्य ठरवणे त्या कालावधी नंतर चलन म्हणून वापरता येत नाही ८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री ४.३० वाजता भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या चलनाचे विमुद्रीकरण निर्णय जाहीर केला की रात्री १२ नंतर पाचशे व हजाराच्या नोटा चलनातून बाद केल्या जातील. ३० डिसेंबर २०१६ पर्यंतच बँक खात्यात हे चलन भरता येईल. सरकारने एकप्रकारे काळ्या पैशांवर सर्जिकल स्ट्राईक केल्याची सार्वत्रिक भावना आहे. पाचशे आणि हजार च्या नोटा रद्द झाल्यामुळे बाजारात चलन घट म्हणजे नोटांचा तुटवडा निर्माण होईल. ज्यांनी तस्करी, भ्रष्टाचाराच्या मार्गाने पैसा जमवला आहे ते कारवाई होईल या भितीने ते पैसा जाहीर करणार नाहीत. त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये नोटा कमी होऊन चलनघटची स्थिती निर्माण होईल. दहा, पन्नास आणि शंभर रुपयांच्या नोटांची मागणी वाढणार आहे. बाजारातून नोटांचा पुरवठा कमी होणार असला तरी वस्तु तितक्याच राहणार आहेत. भरपूर लोकांकडे कायदेशीर मार्गाने कमावलेले पैसा आहे. हा पैसा ते बँकेत डिपॉझीट करतील. बँकाकडे जास्त पैसा जमा झाल्यामुळे कर्ज अधिक सहजतेने उपलब्ध होईल.हे कर्ज कमी व्याज दरावर उपलब्ध असेल .त्यामुळे महागाई वाढेल.

या एकाच निर्णयामुळे सरकारला काळा - पैसा भ्रष्टाचार,दहशतवाद, आणि बनावट नोटा




रोखण्यात यश येईल. नोटाबंदीचा काहीच फायदा झाला नसल्याचे उघड झाले आहे. सरकारच्या नोटबंदी च्या निर्णयानंतर चलनातून बाद झालेल्या ९९.३% नोटा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ला माघारी मिळाल्या आहेत. आर.बी.आय. ने जाहीर केलेल्या वार्षिक अहवालातून ही सत्यता सर्वांसमोर आली आहे. नोटाबंदी चा निर्णय झाल्यानंतर पाचशे आणि एक हजार रुपयांच्या सुमारे १५ लाख ४१ हजार कोटी रुपयांच्या नोटा चलनातून बाद झाल्या होत्या. त्यापैकी आत्तापर्यंत १५ लाख ३१ हजार कोटी रुपयांच्या नोटा रिझर्व्ह बँक वाढण्याची गती मंदावेल. यामुळे किंमती मध्ये सुधारणा होईल आणि रिअल इस्टेटमधल्या अव्यवहार्य किंमतीना प्रतिबंध होईल. नोट बंदीच्या निर्णयामुळे सेकण्डरी मार्केट म्हणजे रिसेल मार्केट अधिक प्रभावित होईल. पण प्रायमरी मार्केट म्हणजे नव्या घरांच्या मार्केटवर तुलनेने कमी प्रभाव पडेल. कारण या मार्केटमधली बहुतांशी घर ही बँकेकडून गृहकर्ज काढून खरेदी केली जातात. रिसेल मार्केटमध्ये मात्र रोख पैशाचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो.

दीर्घकाळ विचार केला तर या निर्णयाचा चांगला परिणाम अनुभवायला मिळेल. सध्या काळा पैसा असणारे आणि प्रामाणिक पणे कर भरणारे असे दोन्ही प्रकारातले नागरिकांना एकाच पध्दतीने व्यवहार करावे लागतात. पण भविष्यात चित्र बदलेल. पुढील वर्षभर रिअल इस्टेट सेक्टरमध्ये गोंधळाच वातावरण कायम राहिल्याच बघायला मिळू शकत. पण त्यामुळे समांतर काळ्या पैशांच्या अर्थव्यवस्थेवर प्रहार होतील. त्याच वेळी 'रेरा' कायद्याच्या अंमलबजावणीमुळे या क्षेत्राला शिस्त लागेल. असेही राहुल शाह यांना वाटत.

धन योग्य मार्गाने मिळवाव आणि त्या धनाचा वापर विचार करुन योग्य ठिकाणी करावा.असा भ्रष्टाचार मुक्त भारत बनवायचे स्वप्न नरेंद्र मोदींचे होते पण नोटाबंदी केल्यानंतर सरकारने मोठा आव आणत मोठ्या प्रमाणात काळा पैसा बँकेत परत येणार असा दावा केला होता. मात्र रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने जाहिर केलेल्या या नोटबंदी आकडेवाडीने नोटबंदीच्या निर्णयाचा नेमका फायदा काय झाला आणि कोणाला झाला असा प्रश्न उपस्थित आहे ? म्हणून नोटाबंदी यशस्वी झाली का नाही ? आपल्याला काय वाटते......

**- शुभांगी राजेंद्र रणदिवे (एस.वाय. बी.कॉम.)**



# आंधळी भक्ती

श्रध्दा आणि अंधश्रध्देचा
जेव्हा लागत नाही मेळ
फावतं भोंदू बाबांच
अन् होतो भावनांशी खेळ
परमात्म्याला बळजबरीने
स्वत:च घेतात ते ओढुन
फसवुन भोळ्या लोकांना
राहतात ते ढोंगी देव बनुन
मोह मायेने बरबटलेले अशांत हे हैवान
कळत नाही शिष्य सारे
कशी ठेवतात बुध्दी गहाण
हरवत चालली आहेत
सारी मानवतेची तत्व
म्हणुन प्राप्त होते आहे.
भोंदूना खोटं दैवत्व
अशांत निराश मन सारी
निघतात शांतीच्या शोधात
आपसुकच सापडतात ती
मायावी बाबांच्या जाळ्यात
भोंदू बाबा दिसु लागेलत
कोठे टेकवु मी माथा
वाहतं जणु बुडत चालल्या
पुन्हा तुकोबांच्या गाथा
टाळुन ते फसवे संमोहन
जिवंत ठेवावं विचारांना
उघडया डोळ्यांनी वाचावं
बुध्दीच्या त्या सुविचारांना
खरी नव्हे बरी नव्हे, आंधळी अशी ती भक्ती
सद्-विवेक बुध्दीने वाढावी
तना-मनाची शक्ती

# अंधश्रध्दा निर्मुलन






समाजामध्ये अनेक रुढी-परंपरा आपण आपल्या परीने जपत असतो. माणसाने नेहमीच श्रध्दा ठेवावी पण अंधश्रध्दा नसावी आता आषाढ श्रावण - भाद्रपद हे सणवाराचे महिने सुरु होत आहेत. सणाच्या निमित्ताने दान-धर्म, उपवास केले जातात. दानधर्म केला जातो. खरं तर अशा पध्दती जरुर जपाव. महत्व देतांना मात्र त्या व्यक्तीला खरंच तुमच्या देण्याची गरज आहे का हे पाहावे. आता हेच बघ ना ! आपण ज्याच्याकडे खुप काही असते. त्यालाच द्यायला उत्सुक असतो. पण ज्याच्याकडे नाही त्याच्या विचारही डोक्यात घेत नाही. कामाला असणारी मावशीच काय पण आपल्या आसपास असे खूप जण असतात. ज्यांना आपल्या मदतीची खरंच गरज असते. पण होते. मात्र उलटेच आपण ज्या परंपरा जपतो त्यांचा योग्य उपयोग होतो का हे ही पाहिलेच पाहिजे. कोणीतरी सांगतो म्हणुन करायचे. यापेक्षा तुमच्या मनाला पटणाऱ्याच गोष्टी करा. माणसाने श्रध्दा ठेवली तर त्याचा त्रास होत नाही. पण अंधश्रध्देने मात्र बरीच कामे बिघडतात.

आजच्या या धक्काधक्कीच्या जीवनातही बरेच जण त्या परंपरांना व्यवस्थित जपतात. ही खरं तर चांगली गोष्ट आहे. पण त्यामुळे त्यांना स्वतःला त्रास होत नाही. ना याचीही त्यांनी स्वतःच काळजी घ्यायला हवी. उपवास केल्याने आजारी व्यक्तींना त्रास होतो. हे त्यांना डॉक्टरांनी घरच्यांनी सांगितलेले असते.

पण इतके दिवस केले अन् आता सोडले तर प्रकृती बिघडवणे योग्य आहे का ? सोनारानेच कान टोचावे ही एक म्हण आपल्याकडे रुढ आहे. पण इथे तर डॉक्टरांचेही ऐकलं जात नाही तसं तर स्त्रियांना घरात बसणाऱ्या असो किंवा कामाला जाणाऱ्या असो त्यांना काम भरपुर असते. घरची काय कमी म्हणून बाहेरच्याही बऱ्याच जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपवलेल्या असतात. मग या साऱ्या ताण-तणावात त्या स्वतःचे आरोग्य जपायचेच विसरुनच जातात.

पैसा मिळतो तो कष्टाने, बुध्दीने आणि अक्कल हुशारीनेच ! माणूस चंद्रावर राहणाच्या गोष्टी करीत असताना आजही आपण जमिनित गुप्तधन आहे अशा अफवांवर विश्वास ठेवत आहोत. या गुप्तधनासाठी नरबळीचा प्रयोग करायचा हा प्रकारच अनाकलनीय आहे याला आळा घालण्यासाठी सरकार, पोलिस प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज असून अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीत जनसामन्यांचा सक्रिय सहभागही गरजेचा आहे.

नाशिक जिल्ह्यात महिनाभराच्या कालावधीत नरबळीच्या दोन घटना प्रकाशझोतात आल्या. यामुळे संपुर्ण जिल्हा हादरुन गेला आहे. इगतपुरी, त्र्यंबकेश्वर तालुक्यात आई व मावशीचा सुखासाठी बळी घेण्यात आला तर, बागलाण तालुक्यात गुप्तधनासाठी आई-वडिलांनी पोटच्या मुलीचाच बळी देण्याची तयारी केली होती अशा घटना देशभरात नेमाने घडत असतात. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या हत्येनंतर राज्य सरकारने अंधश्रध्दा निर्मूलन संदर्भात कायदाही केला. मात्र त्या कायद्याची अंमलबजावणी हवी तितकी कठोर पध्दतीने होत नसल्याने या घटना थांबता थांबत नाही फक्त कायदा करुन चालणार नाही. तर या मुद्यावर जनजागृती गरजेची आहे . आणि एकुणच या अंधश्रध्दा निर्मुलन चळवळीत जन सामन्यांचा सक्रिय सहभागही गरजेचा आहे. त्र्यंबकेश्वर तालुक्यात घरातील सुखासाठी दोन मुलांनी आई व मावशीचा बळी दिला. हे प्रकरण उजेडात आल्यानंतर दोन्ही मुलांसह दोन मंत्रिकांनाही अटक करण्यात आली. मात्र नरबळी देऊन खरेच सुख मिळते का ? या प्रश्नाचे उत्तर ज्यांनी नरबळी दिला नाही त्यांनाही देता येणार नाही. याउलट त्यापासुन त्यांच्या वाट्याला नरकयातनाच आल्या आहेत. गुप्तधनासाठी बालगाण तालुक्यातील सुटाणा

शहरातही आई–बापाने आपल्या मुलीचा बळी देण्याचा प्रयत्न केला. भावानेही बहिणीला गुप्तधनासाठी मारहाण केली. तिचा बळी देण्यासाठी आई–वडिलांनी साथ दिली.

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती ही अंधश्रध्देच्या विरोधात प्रबोधनाच्या मार्गाने कार्य करणारी एक संघटना आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने सातारा येथे इ.स. १९८९ मध्ये या महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीची स्थापना केली. ते पुढील २० वर्षे संस्थेचे कार्याध्यक्ष होते. ती जबाबदारी आता अविनाश पाटील यांनी स्वीकारली आहे.

नाशिक येथे दि. ४ ते ६ जुन २०१० या कालावधीत झालेल्या राज्य कार्यकारिणी बैठकीत ३ वर्षांसाठी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

जोपर्यंत सर्वसामान्य जनता यात सक्रिय सहभाग घेत नाही तोपर्यंत अंधश्रध्देला खतपाणी मिळतच राहणार आहे.

**– भंडारी श्वेता (एस.वाय.बी.कॉम)**

# आयुष्य...

आयुष्याच्या वाटेवर थांबायच नसतं
आयुष्याच्या पैलतीरावर जायचं असतं
नशीब कोणी दुसरं लिहित नसतं
आपलं नशीब आपल्याच हाती असतं
येतानाही काही आणायचं नसतं
जातानाही काही न्यायचं नसतं.
मग हे आयुष्य तरी कोणासाठी जगायचं असतं
मग खरं तर याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी
जन्माला यायचं असतं

# बेटी बचाओ - बेटी पढाओ




मैं भी लेती श्वास हूँ,
पत्थर नहीं इंसा हूँ.
कोमल मन है मेरा
वही भोला सा है चेहरा.
जजबातों मैं जीती हूँ
बेटा नहीं, पर बेटी हूँ.
कैसे दामन छुडा लिया
जीवन के पहले ही मिटा दिया.
तुझ से ही बनी हूँ
बस प्यार की भूखी हूँ.
जीवन पार लगा दूंगी
अपनालों, मैं बेटा भी बन जाऊँगी
दिया नहीं कोई मौका
बस पराया बनाकर सोचा
एक बार गले से लगा लो,
फिर चाहे हर कदम आजमोलो.
हर लढ़ाई जीत कर दिखाऊँगी
मैं अग्नि में जलकर भी जी जाऊँगी
चंद लोगो की सुन ली तुमने
मेरी पुकार ना सुनी
मैं बोझ नहीं भविष्य हूँ
बेटा नहीं पर बेटी हूँ
बेटी को मत समजो भार
जीवन का है ये आधार.

# वृक्षवल्ली आम्हां सोयरे

संध्याकाळच्या वेळेला 'तु माझा सांगाती' ही मालिका पाहात बसले होते. त्यात संत तुकाराम 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' हा अभंग म्हणत होते. खरोखरच वृक्षवल्ली हेच माणसाचे खरेखुरे स्नेही आहेत.

फुलांचे फुललेले ताटवे, भ्रमरांचे रुजी घालणारे थवे मोहरलेला आम्रवृक्ष पाहून मन प्रसन्न होते. वर्षाऋतुचा काळात जिकडे–तिकडे पसरलेला हिरवा रंग आणि आसमंतात भरुन राहिलेला हिरवा ओला धुंद असा गंध हे वर्षाऋतुतील सृष्टीचे आगळे रुप मानवी मनातील भिन्नता पळवून लावतो.

तात्पर्य यंत्रयुगाची सारी झगमग व कागदपत्रांची रुक्ष उलथापालथ दूर सारुन मनुष्य वनराईच्या संगतीत राहीला.पावसात फिरला, फुलांत रमला तर निसर्गातील या हिरव्या रंगाचा साज त्याच्याही मनाला येतो. व निसर्गाचाच एक भाग बनतो.

वृक्ष आपल्या मनाला केवळ शांतता देतात असे नाही तर ते आपल्या कल्याणाचीही चिंता करतात. आपल्या हितासाठी झटतात. राजद्वाराप्रमाणे स्मशानातही आणि संपत्तीप्रमाणे विपत्तीतही ते आपल्याला सोडत नाहीत वृक्ष सन्मित्र आहेत.

पर्जन्याचे दान देण्यासाठी त्यांचा उपयोग होतो मृदा वाहून जाऊ नये म्हणून घट्ट धरुन ठेवतात. आपल्याला फुलांचा सुगंध , फळांचा आस्वाद व स्नेहाची सावली देतात. एवढेच नव्ह तर दधिची ऋषींनी ज्याप्रमाणे शांततेसाठी देवांना आपली हाडे दिली त्याच त्याग भावनेने ''हो



कुठार, कर उगार। घाव आता घाली ।।'' असे म्हणून मानवाला आपला अंत करावयास सांगतात.

परंतु प्रगतीचा कैफ चढलेला माणूस निसर्गावर घाला घालत आहे. मोठमोठ्या इमारती उभारण्यासाठी दाट अरण्ये उध्वस्त करत आहे. अन्न शिजविण्यासाठी घरे सजवण्यासाठी वरिमाप, जंगलतोड केली जात आहे. यामुळे पर्यावरणाचे संतुलन ढासळत चालले आहे. आपल्याच कृत्याचे फळ म्हणून की काय सन २०१५ मध्ये म्हणजेच त्या वर्षी सप्टेंबर महिना उजडला तरीही पावसाने दांडी मारली होती. सगळ काही शक्य आहे असे वाटणाऱ्या माणसाला पाऊस मात्र कधीही आणता येत नाही.

म्हणून म्हणावेसे वाटते हे माणसा आता तरी जागा हो असे हे वृक्ष वर्षानुवर्षे उभे आहेत. ते आपल्यासाठीच. तुजशी याची मधुर फळे चाखली तशी पुढच्या पिढीलाही मिळू दे. त्याच्या अंगा खाद्यावर त्यांनाही बागडू दे. सामाजिक वणी करणाचे व्रत अंगीकार, मग बघ ही आपली भारतमाता पुन्हा एकदा हिरवागार फुलून जाईल.

'मग मानव पूर्वीप्रमाणे म्हणू लागेल,
वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे'

**– उमाप प्राजक्ता विजय (टी.वाय. बी.कॉम.)**

# मानवी जीवनातील स्वच्छतेचे महत्त्व




स्वच्छ भारत अभियान किंवा स्वच्छ भारत मोहिम भारत सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सर्वात महत्वाकांक्षी प्रकल्पांपैकी हा एक प्रकल्प आहे. प्रधान मंत्रीनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने स्वच्छ भारत अभियान जाहिर केले. राष्ट्रीय स्तरावर या अभियानाची दाखल घेतली जात आहे. स्वच्छ भारत अभियान या मोहिमेचा एक मुख्य ध्येय आहे भारतातील सर्व शहरे आणि गावे ओपन डेफकेशन फ्री म्हणजेच हगणदारी मुक्त करणे यासोबतच स्वच्छ भारत अभियानाचा उद्देश भारतातील रस्ते व पायाभूत सुविधांची स्वच्छता करणे हा आहे. या मोहिमेविषयी सर्वोत्तम गोष्ट म्हणजे सर्व शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये स्वच्छता आणि शौचालयांची उपलब्धता यावर लक्ष केंद्रित करणे ही आहे. या स्वच्छ भारत अभियानातून भारतीयांना स्वच्छतेचे महत्व आणि फायदे यांची जाणीव करुन देणे हे सुध्दा आहे.

भारत सरकारला स्वच्छ भारत मोहिम सुरु करण्याचा हा प्रथमच प्रयत्न नाही.१९९९ मध्ये भारत सरकारने ''संपुर्ण स्वच्छता अभियान '' सुरु केले जे नंतर पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी त्याचे ''निर्मल भारत अभियान'' असे नामकरण केले. परंतु स्वच्छ भारत अभियानाला पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली संजीवनी मिळाली. आपल्या शपथविधीमधे शौच आणि स्वच्छता वरती बोलणारे ते जगातील पहिलेच नेते असावेत. यातून त्यांची स्वच्छतेबद्दलची आवड आणि संकल्प ही दिसतो. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राष्ट्रीय पातळीवर मोहिम राबविली आणि नागरिकांना भाग घेण्यास आवाहन केले. त्यांनी स्वत ः झाडू हातात घेतला. काहींना हा राजकीय स्टंट वाहू शकतो. पण या सर्वातून एक फायदा झाला की आपण भारतीय लोक स्वच्छते बद्दल बोलू लागलो. स्वच्छ भारत अभियानाने भारतातील स्वच्छता आणि त्याच्या निगडीत कामांवर प्रचंड प्रभाव पडला आहे आणि दिवसेंदिवस मोहिमेची प्रगती होत आहे. स्वच्छ भारत अभियान मोहिमेची स्वतःची अधिकृत वेबसाइट व ॲप आहे जेथे आपण या मोहिमेच्या प्रगतीचा आढावा घेऊ शकतो. आतापर्यंत १,४०८.२८० घरात शौचालये बांधली गेली १,४३,४९१ गावे ७९ जिल्हे व ३ राज्ये खुल्या शौचापासून मुक्ती झाली आहे. विविध राजकारणी सेलिब्रिटीज, अभिनेते आणि क्रिडापटूंनी या मोहिमेत सहभाग घेतला होता. आणि या अभियानाची क्षमता वाढवून दिली. सचिन तेंडुलकर, कमल हसन, अनिल अंबानी, विराट कोहली, प्रियांका चोप्रा  आणि असेच अनेक जणांनी झाडू हातात घेतला आणि रस्ते साफ केले. मोदींच्या या अभियानाचा एक चांगला प्रचार केला. या मोहिमेचे लक्ष्य आहे की, महात्मा गांधीजीच्या १५० व्या जयंती पर्यंत ग्रामीण भारतात १२ दशलक्ष शौचलये, तसेच शहारांत स्वच्छतेसाठी विविध सेवा उपलब्ध करुन देण्यात येतील.

२०१९ पर्यंत भारताला ओपन डेफकेशन फ्री (ओडीएफ) बनवणे हे स्वच्छ भारत अभियानाचे प्राथमिक उद्दिष्ट ओ.डी इ. आहे. स्वच्छ भारत अभियान हा एक खूप मोठा प्रकल्प आहे. आणि ३० लाखांपेक्षा अधिक सरकारी कर्मचारी तसेच शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या मोहिमेत भाग घेतला आहे. या मोहिमे अंतर्गत भारताच्या ४०४१ शहरे आणि गावांना १.९६ लाख कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. या मोहिमेने केलेल्या जागृतीने अनपेक्षित बदल घडत आहेत. भारतातील हिंदी चित्रपट जगातील (बॉलिवुड) सुपरस्टार अक्षय कुमार आणि भूमी पेडणेकर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या  ''टॉयलेट एक प्रेम कथा '' नावाच्या चित्रपटाद्वारे भारतातील खुल्या शौचाच्या

समस्येच्या निर्मूलनास समर्थन देण्यास सुरुवात केली आहे. हा चित्रपट ग्रामीण भागातील स्त्रियांच्या समस्येवर प्रकाश टाकतो. ग्रामीण भागात शौचालये बांधण्याची आवश्यकता आहे. असा विषय एका दिग्गज कलाकारने करणे मोठी गोष्ट आहे याचा अर्थ असा आहे की स्वच्छता विषयावर लोक आता विचार करु लागली आहे. आपल्या जीवनात स्वच्छतेचे महत्व कोणीही नाकारु शकत नाही. स्वच्छ परिसर ,हवा, पाणी, वातावरण कोणाला नकोसे असते. स्वच्छतेने रोगराई नष्ट होते. आजार पसरत नाही. आणि आपली जीवनशैलीही बदलून जाते. स्वच्छ परिसरातील लोक मॉर्निंग वॉक किंवा जॉगिंग ला जास्त जाताना दिसतात. अश्या चांगल्या सवयीचा आपल्या जीवनावर चांगला परिणाम होतो, स्वच्छ पटांगणात मुले खेळतात. आपले व्हिडिओ, गेम, मोबाईल दूर करुन मैदानात येतात. ॲक्टिव्ह होतात. याचा फायदा असा होतो की मुलांचा अभ्यासाचा ताण कमी होतो. ती खुश आणि निरोगी राहू लागतात. आपल्याला हे सगळे माहीत आहे, पण तरीही आपण यासाठी काहीच करत नाही. आपण आपले घर स्वच्छ ठेवतो. आणि परिसराकडे दुर्लक्ष करतो. घर आपले परिसर दुसऱ्यांचा या विचाराने आपल्या भारताचा ऱ्हास केला आहे स्वच्छता हे फक्त सरकारचेच काम नाही. ही त्यांची जबाबदारी जरुर आहे. सरकारने योग्य त्या सुविधा पुरविल्याच पाहिजेत. पण जोपर्यंत आपण स्वच्छता प्रिय होत नाही. स्वच्छतेचे महत्व  फायदे जाणून घेत नाही तो पर्यंत काहीही बदल होणार नाही.

आज मी तुम्हां सर्वांना स्वच्छतेची शपथ घेण्याची विनंती करते. अशा चांगल्या कारणासाठी सरकारला समर्थन देऊयात. या देशाचे भविष्य आपल्या युवांच्या हातात आहे हे लक्षात ठेवा ''कुठलाही देश परफेक्ट नसतो तो बनवावा लागतो '' माझ्या बरोबर म्हणा ''आज मी ग्रीन आणि क्लीन इंडिया बनविण्यासाठी प्रतिज्ञा घेते/घेतो ,मी रस्त्यावर कचरा फेकणार नाही आणि कुणाला फेकू ही देणार नाही. मी माझ्या घरच्यांना आणि मित्रांना स्वच्छतेचे महत्व पटवून देईन. मी माझ्या भारताला स्वच्छ आणि सुंदर बनविन कोणी साथ दिली किंवा नाही दिली तरी
स्वच्छ भारत, समृध्द भारत...जय हिंद, जय भारत...

**– रणदिवे शुभांगी राजेंद्र (एस.वाय.बी.कॉम.)**

## मानवी जीवनातील स्वच्छतेचे महत्व



उमाप प्राजक्ता विजय
(टी.वाय.बी.कॉम.)

स्वच्छतेचे महत्त्व
स्वच्छता ही एक कला आहे,
स्वच्छता कशा राखायची,
हे ज्याचे त्याने ठरवायचं
अडचणी सर्वांनाच असतात,
अडचणी सोडवायच्या, की
रडत बसायचे,
हे ज्याने त्याने ठरवायचे
खरंच स्वच्छता ही आपल्या जीवनात नंदनवन फुलविते.
स्वच्छतेचाच आग्रह सर्वांनी धरला पाहिजे,त्यामुळे केवळ आपल्या शारीरिक नव्हे तर सामाजिक तक्रारी देखील दुर होतील. कारण आपण पाहातो. आजुबाजुला पडलेला कचरा केवळ आपलेच नाहीतर प्राण्यांच्या आरोग्याकरीता अपयाकारक आहे. म्हणूनच सर्वांना हीच विनंती की आपण जसे आपले घर स्वच्छ ठेवतो. तसेच परिसर ही स्वच्छ ठेवण्यास कटी बद्ध असावे. आपण शारिरीक स्वच्छता नियमित करावी त्यामुळे आपण इतरासाठी आदर्श ठरु शकतो. ओला कचरा व सुका कचरा याचे योग्य व्यवस्थापन व्हायला हवे चला तर मग स्वच्छता पाळू , रोगराई टाळू

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे

वृक्ष झाडे आपणांस ऑक्सिजन देतात. ऑक्सिजन शिवाय आपण काही मिनिटांपेक्षा जास्त जगू शकत नाही. वृक्ष आपल्याला सावली, ऑक्सिजन ,शुद्ध हवा देतात. पशु, पक्षी यांना रखरखत्या उन्हांपासून सावली देतात. वृक्षांच्या मुळ्या मुळे जमिनिची धूप थांबते. व चांगली पिके येतात. औषधी वनस्पती,कंदमुळे यामुळे बऱ्याच रोगांवर उपाय होतो. वृक्षांपासून आपल्याला बराच फायदा होतो.

मोठ-मोठी घरे बांधण्यासाठी आपण झाडे तोडतो. व मोठ मोठ्या बिल्डींगस् बांधल्या जातात आता ही वृक्षतोड एवढी सामान्य झाली आहे की आपणास याबद्दल काहीच वाटत नाही. आपण पाहतो आजकाल दुष्काळ खूप पडतो. पाण्याची टंचाई जाणवते. पृथ्वीचे तापमान वाढत आहे. जर निसर्गाचा, जंगलांचा असाच ऱ्हास होत राहिला तर पशुपक्ष्यांचे व मानवाचे जगणे अशक्य होईल.

पशु,पक्षी,वृक्ष,जंगले आणि अगदी कीटकसुद्धा मानवी जीवन चक्राचा भाग आहे हे जीवनचक्र बदलले तर मानवाचे जीवनचक्र बदलू शकते. जर आपण असाच निसर्गाचा विनाश केला तर आपल्याला अन्नधान्य मिळणार नाही मानव हा जगूच शकणार नाही.

यावर उपाय म्हणून सरकारने काही निर्णय घेतले पाहिजे विविध सामाजिक संघटना, अनेक प्रकारच्या योजना, परियोजना अंमलात आणल्या पाहिजे. विविध नियम, कायदे मानवाला वृक्षतोड करण्यापासून थांबवू शकते. या योजनांमध्ये सर्व सामान्य लोकांनी सहभाग घेतला पाहिजे. आणि या योजना देशातच नव्हे तर जगभरात वृक्षरोपणासारखा मोहिमांची गरज आहे.

याड लागलंय SSS याड लागलंय SSSS
हे गाण म्हणण्याऐवजी
झाड लावलंय SSS झाड लावलय SSSS
असं म्हणून तसं वागलो तर निसर्ग झिंग झिंगाट होईल.

- वैष्णवी दत्तात्रय धाडगे (एस.वाय.बी.कॉम.)



# मेरा सच्चा साथी

कही देखा है तुमने उसे
जो मुझे सताया करता था
जब भी उदास होती थी मै
मुझे हसाया करता था
एक प्यार भरा रिश्ता था हमारा
जो मुझे अब भी याद आता है
खो गया वक्त के भँवर में कही
जो हर पल मेरे साथ होता था ।
आज एक अजनबी तरह हाथ मिलता है,
जो उसके दिल की छोटीसी बात भी
मुझे बताता था ,
कही मिला वो मुझे किसी भीड पर
तो उसे मेरा संदेशा देना
कोई है जो आज भी उसका इंतजार करती है
जिसको वो अपना सच्चा साथी बोला करता है ।


- शेलार कल्याणी (एस.वाय. बी.कॉम.)

# मैत्री

जगात काही गोष्टी अशा आहेत की ज्यांचे मोल कधी करता येत नाही. त्यापैकी एक म्हणजे 'मैत्री ' मैत्री हा अनमोल ठेवा आहे म्हणून प्राचीन काळापासून अशा मैत्रीला नावाजले जाते. ज्याला खरा मित्र लाभला आहे तो खऱ्या अर्थाने धनवान असतो. नाहीतर कोट्यावधी रुपये आहेत पण मनीचे सुखदुःख उघड करायला कोणीही मित्र नाही. तो राव असुनही रंकच ठरतो.

मैत्री ही ठरवून होत नसते. 'चल तू आणि मी मित्र होऊ' असे म्हणून ठरवून मित्र बनत नसतो. म्हणून तर प्रत्येक सहाध्यायी सहव्यवसायी हा मित्र असु शकत नाही सहवासाने परिचय होईल. पण मनाच्या तारा जुळतीलच असे नाही प्रसिद्ध लघुनिबंधकार ना. सी. फडके सांगतात. मैत्री ही स्फुल्लिंगासारखी आहे. ती केव्हा प्रकट होईल सांगता येणार नाही. एखाद्या क्षणी जुळलेली ही मने वर्षानुवर्षे जुळलेली राहतात, संस्कृत सुभाषितकार सांगतो, व्यसने मित्रपरिक्षा, संकटातच मित्राची परिक्षा होते. खरा मित्र कसा ओळखावा ? साधारणतः जगरहाटी अशी असते की, असतील शिते तर जमतील भुते जोवर आपल्याजवळ भरपुर काही आहे, तोवर मैत्रीचा, प्रेमाचा देखावा करणारी मंडळी आपल्या भोवताली जमतात. ते आपली खुशामत करतात. पण आपल्या पडत्या काळात ही जमलेली पाखरे भुर्रकन उडुन जातात.

खरा मित्र कधीच खुशामत करत नाही. उलट आपण चुकत असलो तर कठोर शब्दांच्या फटकाऱ्याने तो आपल्याला जागे करतो. आपल्या विजयाने , यशाने तो आनंदी होतो आणि मनापासून तो आपले अभिनंदन करतो, गौरवतो. अडचणीच्या काळात काहीही न सांगता तो मदतीला धावुन येतो.



त्या बाबत तो परतफेडीची अपेक्षा करत नाही ना .सी.फडके सांगतात की,आमचे चुकते पाऊल जो फिरवतो आणि जाणारा तोल सावरतो तोच खरा मित्र होय असा मित्र लाभणे आणि त्यापासून मैत्रीचे वैभव लाभणे, यापेक्षा परमभाग्य कोणते ? इंग्रजीत एक म्हण आहे.

***'Friend in need is friend indead'***

**– शेलार कल्याणी** **(S.Y. B.com)**

## तू माझ्यावर प्रेम करत होतीस

**पाऊसाचा पहिल्या सरीत**
**तू एकटीच भिजत होतीस.**
**मला उशीर होतो मानून,**
**माझ्यावर ची इथं होतीस,**
**पाऊसाकडे बघत**
**समुद्रकिनाऱ्यावर बसत होतीस,**
**लाटांचा पलीकडे वाळूला,**
**क्षितिजावर लोटत होतीस,**
**राग कितीही असला तरीही,**
**तू माझ्यावर प्रेम करत होती,**

# बहुभाषिक व्हा !

आमच्या भारतात प्राचीन काळापासून अनेक भाषा बोलल्या जातात. या सर्व भाषांना आमच्या राज्य घटनेने मान्यता दिलेली आहे. या सर्व भाषांचा विकास साधावा म्हणून आपल्या देशाने भाषावर प्रांतरचना स्वीकारली आणि या सर्व भाषांना राज्यभाषेचा मान मिळालेला आहे. आज या सर्व भाषांतील वाङ्.मय समृध्द आहे. पण आम्हांला ते परिचित आहे का ? नाही कारण आम्हांला त्या भाषा येत नाहीत.

आपण आपली मातृभाषा लहानपणापासून बोलत असतो म्हणून ती आपल्याला सहजगत्या येते. तरी पण आपण त्या भाषेचा अभ्यास केला पाहिजे. कित्येकदा आपल्याला मातृभाषेतील उत्तम ग्रंथांची आपल्याला ओळख नसते. आपल्या भाषेची, व्याकरणाची वैशिष्ट्ये आपल्याला ज्ञात नसतात ती आपण चांगली माहिती करुन घेतली पाहिजेत .

आपली राष्ट्रभाषा हिंदी आहे. या राष्ट्रभाषेचाही आपण चांगल्या प्रकारे अभ्यास केला पाहिजे जर मला माझ्या राष्ट्रांचा अभिमान असेल, तर मला माझी राष्ट्रभाषा ही उत्तम यायला हवी.

मातृभाषा, राष्ट्रभाषा, याप्रमाणे इतर भाषाभगिनींचाही अभ्यास करायला हवा. हल्ली दुरचित्रवाणीवर काही कार्यक्रमांत इतर भाषांतील कथा वा नाटके हिंदीतुन वा मराठीतुन दाखवतात.त्यामुळे आपल्या लक्षात येईल की आपल्या मराठीत जितके उत्कृष्ट वाङ्.मय आहे. तितकेच ते इतर भाषांतही आहे. दरवर्षी ज्ञानपीठ पारितोषिक कुठल्या ना कुठल्या भाषेतील पुस्तकांना मिळतेच. ती पुस्तके वाचायची असतील तर आपल्याला त्या भाषा यायला हव्यात रवींद्रनाथ



टागोरांच्या कविता भाषांतरित रुपात आपण वाचतो, पण बंगाली भाषेचा अभ्यास केला तर आपल्याला रवींद्रनाथ , शरदचंद्राचे वाङ्.मय मुळ स्वरुपात वाचता येईल.

असे हे बहुभाषिक एकत्र येतील तेव्हा ते एकमेकांच्या भाषांत बोलु शकतील त्यामुळे त्यांच्यांत जिव्हाळा निर्माण होईल.इंग्रजांनी आपल्या देशावर काही वर्षे राज्य केले. त्यामुळे आपणांस इंग्रजी भाषेची ओळख झाली. आपण इंग्रज राज्यकर्त्यांशी लढलो पण आपले इंग्रजी भाषेशी काही वाकडे नाही. इंग्रजी भाषा ही आज बऱ्याच ठिकाणी जागतिक व्यवहाराची भाषा झाली आहे तेव्हा तिचा अभ्यास करणे जरुरीचे आहे.

आज वैज्ञानिक साधनांमुळे जग फार जवळ आले आहे. मग या प्रगत जगाची ओळख करुन घ्यायची असेल तर त्याही भाषा आपल्या परिचयाच्या व्हायला हव्यात. त्याबरोबर साहित्यसंपत्ती यांनी समृध्द आहे. तिच्याशीही आपली मैत्री व्हायला हवी. म्हणजेच आपल्याला बहुभाषिक व्हायला हवे.

**– शेलार कल्याणी सज्जन (एस.वाय.बी.कॉम.)**

# बेटी बचाओ बेटी पढ़ाओ



हरियाणा के पानीपत में २२ जनवरी २०१५ को पीएम नरेन्द्र मोदी के व्दारा बेटी बचाओ –बेटी पढ़ाओ के नाम से एक सरकारी योजना की शुरुआत हुई । भारतीय समाज में लड़कियों की दयनीय दशा को देखते हुए इस कार्यक्रम की शुरुआत की गयी । आँकड़ो के अनुसार ,१९९१ में (०–६ वर्ष के उम्र के ) हर १००० लड़कों पर ९४५ लड़कियाँ है, जबकि २००१ में लड़कियों की संख्या ९२७ पर और दुबारा २०११ में इसमें गिरावट होते हुए ये १००० लड़कों पर ९१८ पर आकर सिमट गयी । अगर हम सेंसस के आँकड़ो पर गौर करें तो पाएँगे कि हर दशक में लड़कियों की संख्या में लगातार गिरावट दर्ज हुई है। ये धरती पर जीवन की संभावनाओं के लिए भी खतरे का निशान है । अगर जल्द ही लड़कियों से जुड़े ऐसे मुद्दों को सुलझाया नहीं गया तो आने वाले दिनों में धरती बिना नारियों की हो जायेगी और तथा कोई नया जन्म नहीं होगा ।

देश में लड़कियों के बुरे आँकड़ों को ध्यान में रखते हुए, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने बेटी बचाओ–बेटी पढ़ाओ योजना की शुरुआत की । ये बेहद प्रभावकारी योजना है जिसके तहत लड़कियों की संख्या में सुधार, इनकी सुरक्षा, शिक्षा , कन्या, भ्रूण हत्या का उन्मूलन, व्यक्तीगत और पेशेवर विकास आदि का लक्ष्य पूरे देश भर में है । इसे सभी राज्य और केन्द्र शासित प्रदेशों में लागू करने के लिए एक राष्ट्रीय अभियान के व्दारा देश ( केन्द्रीय मानव संसाधन मंत्रालय, स्वास्थ तथ महिला एवं बाल विकास मंत्रालय) के १०० चुनिंदा शहरों में इस योजना को लागू किया गया है । इसमें कुछ सकारात्मक पहलू ये है कि ये योजना लड़कियों के खिलाफ होने वाले अपराध और गलत प्रथाओं को हटाने के लिये एक बड़े कदम से रुप में साबित होगा । हम ये आशा करते हैं कि आने वाले दिनों में सामाजिक–आर्थिक कारणों की वजह से किसी भी लड़की को गर्भ में नहीं मारा जायेगा, अशिक्षित नहीं रहेंगी, असुरक्षित नहीं रहेंगी,बलात्कार नही होगा आदि । अतः पूरे देश में लैंगिक भेदभाव को मिटाने के व्दारा बेटी–बचाओ ,बेटी –पढ़ाओ योजना का लक्ष्य लड़कियों के आर्थिक और सामाजिक दोनों तरह से स्वतंत्र बनाने का है ।

पूरे भारत में लड़कियों को शिक्षित बनाने और उन्हें बचाने के लिये प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ने बेटी बचाओ नाम से लड़कियों के लिये एक योजना की शुरुआत की । इसका आरंभ हरियाणा के पानीपत में २२ जनवरी २०१५, गुरुवार को हुआ । पुरे देश में हरियाणा में लिंगानुपात ७७५ लड़कियों पर १००० लड़को का है जो बेटीयों की दयनीय स्थिती को दर्शाता है इसी वजह से इसकी शुरुआत हरियाणा राज्य से हुई । लड़कियों की दशा को सुधारने के तरीके से लागू किया गया है , सबसे कम स्त्री पुरुष अनुपात होने की वजह से हरियाणा के १२ जिलों ( अंबाला, कुरुक्षेत्र, रोहतक, भिवानी, महेन्द्रगण, सोनीपत, झज्ञर, रोहतक, करनाल, यमुनानगर,

पानीपत और कैथाल ) को चुना गया ।

लड़कियों की दशा को सुधारने और उन्हें महत्व देने के लिये हरियाणा सरकार १४ जनवरी 'बेटी की लोहड़ी ' नाम से एक कार्यक्र मनाती है । इस योजना का उद्देश्य लड़कियों को सामाजिक और आर्थिक रुप से स्वतंत्र बनाना है जिससे वो अपने उचित अधिकार और उच्च शिक्षा का प्रयोग कर सकें । आम जन में जागरुकता फैलाने में ये मदद करता है साथ ही महिलाओं को दिये जाने वाले लोग कल्याणकारी सेवाएँ की कार्यकुशलता को भी बढ़ाएगा । अगर हम २०११ के सेंसस रिपोर्ट पर नजर डाले तो हम पाएँगे कि पिछले कुछ दशकों से ० से ६ वर्ष के लड़कियों कि संख्या में लगातार गिरावट हो रही है । अस्पतालों में आधुनिक लक्षण यंत्रों के व्दारा लिंग पता करने के बाद गर्भ में ही कन्या भ्रूण की हत्या करने की वजह से लड़ंकियों की संख्या में भारी कमी आयी है । समाज में लैंगिक भेदभाव की वजह से ये बरी प्रथा अस्तित्व में आ गयी ।

जन्म के बाद भी लड़कियों को कई तरह के भेदभाव से गुजरना पड़ता है जैसे शिक्षा स्वास्थ, सुरक्षा, खान–पान, अधिकार आदि दुसरी जरुरतें हो जो लड़कियों को भी प्राप्त होनी चाहिये । हम कह सकते है । महिलाओं को सशक्त करने के बाय अशक्त किया जा रहा है । महिलाओं को सरकार ने इस योजना की शुरुआत की। महिलाओं के सशक्तीकरण से सभी जगह प्रगति होगी खासतौर से परिवार और समाज में। लड़कियों के लिये मानव की नकारात्मक पूर्वाग्रह को सकारात्मक बदलाव में परावर्तित करने के लिये ये योजना एक रास्ता है

**– कराळे धनश्री रमेश (एस.वाय. बी.कॉम)**

# आई–बाबा मला जगायचयं




आई बाबा मला जगायचयं
हे सुंदर जग डोळ्यांनी निरखुन पहायवसं
जगु द्या मला, जगु दया मला
या नविनशा जगात जन्म घेऊ द्या मला
मी एक छोटीशी निरागस कळी आहे.
उमलू द्या मला उमलू द्या मला
या जगात तुमचे रोशन मी रोशन करील
ताठ मानेने या जगात चालू द्या मला
मी काय दुष्कर्म केलेस
तेव्हा देतास मला ही शिक्षा
तुमच्याकडे मागते आहे मी जीवनाची भिक्षा
प्रत्येकाला एकदातरी जन्म मिळतो गं आई
मला ही जन्मू दे जन्म देण्याआधीच
करु नकोस
मला मारण्याची घाई
मुलाप्रमाणे माना मला मुलाप्रमाणे माना
मुलगाच काय मुलापेक्षाही चांगले
सांभाळील तुम्हाला
जगु द्या मला जगु द्या मला
या नविनशा जगात जन्म घेऊ द्या मला

– खटावकर वैष्णवी ज्ञानेश्वर
(एस.वाय.बी.कॉम.)

# स्वामी विवेकानंद युवकांचे प्रेरणास्थान



युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद एक युगपुरुष आणि महानयोगी होते. बालपणापासूनच विवेकानंद म्हणजेच नरेंद्रनाथ यांना ध्यान करायला आवडते. ते ध्यानाला बसले की तासन्‌तास ध्यान करत . त्यांना सतत प्रश्न पडत. पुढे जाऊन ईश्वर आहे का असा प्रश्न त्यांनी गुरु रामकृष्ण परमहंस यांना केला होता. स्वामी विवेकानंद यांनी मन आणि मनाची शक्ती या विषयाचे चिंतन केले होते.

त्यांच्या मतानुसार एक काळ असा होता की भारतीय लोकांना मन आणि मनाची शक्ती या विषयाने झपाटले होते. विवेकानंद नेहमी सांगत की जी गोष्ट खरच अस्तित्वात नाही त्या गोष्टीचे ढोंग आपण करु शकत नाही.उदाहरणार्थ जादू आज आपण हातचालाकी करणारे जादूगार तसेच दैवी शक्तीने आजार बरे करणारे ढोंगी पाहतो जर ही जादू आणि दैवी शक्ती खरच अस्तित्वात नसती तर आपण तिचे ढोंग कधीच करु शकलो नसतो.

शिक्षणामधून मौलिक विचार करणारी एकही व्यक्ती निर्माण होऊ शकली नाही तर तसे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थी विवेकानंदाना चंदन वाहुन नेणाऱ्या गाढवासारखा वाढतो.कारण चंदन वाहणाऱ्या गाढवाला पाठीवरचा चंदनाची किंमत कधीच समजलेली नसते त्याला चंदनाचे फक्त वजन कळते.

जगामध्ये रामकृष्ण मिशनच्या अनेक शाखा आहेत भारत सरकारतर्फे विवेकानंदांचा जन्मदिवस हा युवक  दिन म्हणून साजरा केला जातो.

शुक्रवार ४ जुलै १९०२ या दिवशी त्यांनी कोलकत्ता जवळील बेलूर मठात समाधी घेतली समाधी घेण्याच्या दिवशी त्यांनी पहाटे बेलूर मठात परिव्राजकांना मठात शुल्क यजुर्वेदाचा पाठ शिकवला आणि स्वामी प्रेमानंद या गुरबंधुसमवेत काही काळ फिरत असतांना त्यांना रामकृष्ण मराठाच्या भविष्यासंबंधात काही सूचना केल्या. ध्यान करत असताना रात्री नऊ वाजून दहा मिनिटांनी त्यांनी समाधी घेतली. आणि चाळीस वर्षापर्यंत आपण जगू ही स्वतःची भविष्यवाणी खरी केली. कन्याकुमारी येथे समुद्रात काही अंतरावर विवेकानंदाचे स्मारक उभारले.

**– कु. वैष्णवी भास्कर शिंपी**
**(एस. वाय.बी. कॉम.)**

**प्रेमाचा प्रवास**

**क्षितिजावरची ती वाट,**
**त्यावर ती नदीची काट,**
**हातात घेऊनी तुझा हात**
**मज वाटे हा प्रेमाचा प्रवास**

# बेटी का जीवन

बेटी को पढ़ाओ इसका जीवन सवारो,
घर बैठा कर ना इसका जीवन बिगाड़ो ।
क्योंकि बिना शिक्षा है जीवन बेकार
शिक्षा प्राप्त करना है हर बेटी का अधिकार ।
पढ़ लिख जायेगी तो पायेगी सम्मान,
बेटी को घर बैठाना है उसका अपमान ।
दो उसे अवसर आकाश में स्वच्छंद उड़ने का,
उसके अंदर भरा हुआ हौसला आग बढ़ने का ।
पढ़ लिखकर हुनर अपना दिखायेगी,
समाज के शिक्षितों में सम्मान पायेगी ।
शिक्षा के व्दारा छू लेगी विस्तृत आकाश,
आगे बढ़कर डालेगी कुरुतियों पर प्रकाश
देखो इसकी शिक्षा का यह विशाल उड़ान ,
जो इसे शिक्षित करके बनायेगी महान ।
पुराने विचारों व्दारा लड़के-लड़की में भेद ना करो,
बेटी को शिक्षा देकर इसका जीवन पूरा करो ।
समाज में फैली हर बुराई को समाप्त करेंगे ।
देश की तरक्की को मिलेगी नया आयाम,
जब बेटियां पढ़ -लिखकर रोशन करेंगी देश का नाम ।
इसीलिए इनकी शिक्षा में कोई बाधा ना डालो,
इनके शिक्षा को लेकर कोई गलतफहमी ना पालो।
बेटी कल्पना चावला बनकर अंतरिक्ष माप चुकी है ,
अपने इरादो से हर बुलंदी को प्राप्त कर चुकी है ।
शिक्षा के व्दारा जीवन के नये आयाम को पाया है।
सफलता प्राप्त करके शिक्षा का महत्व समझाया है ,
इसीलिए महत्त्वपूर्ण है बेटी पढ़ाओ बेटी बचाओ योजना ।।
बेटी को पढ़ाओ इसका जीवन सवारो,

– कराळे धनश्री रमेश (एस.वाय. बी.कॉम)




## जीवनपुष्प

फुले शिकवतात....
गुलाब सांगतो ,
येता-जाता रडायचे नसतं,
काटयात सुद्धा हसायचं असतं.
रातराणी म्हणते,
अंधाराला घाबरायचं नसतं.
काळोखातही फुलायचे असतं.
सदाफुला सांगते,
रुसून रुसून राहायचं नसतं,
हसुन हसुन हसायचं असतं
बकुळी म्हणते,
सावळ्या रंगाने हिरमुसायचे नसतं,
गुणाचय गंधाने जिंकायचं असतं,
मोगरा म्हणतो,
स्वतःचा बडेजावपणा सांगायचा नसतो,
सद्‌गुणांचा सुगंध मैलावरुन ही येतो,
कमळ म्हणतो,
संकटात चिखलात बुडायचं नसतं,
संकटांना बुडवून फुलायचं असतं,
– शिरसाठ सतिश बंडू
(टी.वाय.बी.सी.एस.)



# स्वामी विवेकानंद एक प्रेरणा स्त्रोत



स्वामी विवेकानंद म्हणजे एक तेजाचे भांडारच होय. ते खूप तेजस्वी होते. तल्लख बुध्दीच्या स्वामींनी जगाला खरा अध्यात्म समजवून सांगितले त्यांचे विचार आज ही तरुणांसाठी खूपच प्रेरक आहे.

आस्तिकांपेक्षाही एकवेळ नास्तिक परवडले. कारण नास्तिकाकडे स्वतःचा आणि स्वतंत्र असा तर्कतरी असतो पण अस्तिकाला आपण अस्तिक आहोत,,, याचे एकही समाधानकारक उत्तर देता येत नाही.....

समता,स्वातंत्र्य, जिज्ञासा, उत्साह, उद्योग या बाबातीत पाश्चिमात्यांहूनही अधिक पाश्चिमात्य व्हा.

स्वतःचा विकास करा. ध्यानात ठेवा, गती आणि वाढ हीच जिवंतपणाची लक्षणे आहेत. अगदी सरळमार्गी असणे हेही एक प्रकारचे पाप होय.

आपले मन आपल्या लाडक्या मुलाप्रमाणे असते. ज्याप्रमाणे लाडकी मुले नेहमी असंतुष्ट असतात त्या प्रमाणे आपले मन नेहमी अतृप्त असेच म्हणूनच मनाचे लाड कमी करा. व त्याला सतत लगाम घाला.

आपल्याला अनंत शक्ती, असीम उत्साह, अपार साहस आणि धीर पाहिजे. तरच आपल्याकडून महान कार्ये होतील. चांगल्या पुस्तकाविना घर म्हणजे दुसरे स्मशानच होय. तारुण्याचा जोम अंगी आहे तोवरच कोणतीही गोष्ट शक्य होईल कार्याला लागण्याची अत्यंत उचित अशी हीच वेळ आहे.

दुःखी माणसाला मदत करण्यासाठी लांबवलेला एक हात प्रार्थनेसाठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा अधिक उपयुक्त आहे. देशातील दारिद्रय  व अज्ञान घालविणे म्हणजेच ईश्वराची सेवा होय. दैव नावाची कोणतीही गोष्ट नाही. आपल्याला जबरदस्तीने काही करावयास भाग पाडील अशी कोणतीही गोष्ट या जगात नाही. धर्म म्हणजे मानवी अंतःकरणाच्या विकासाचे फळ आहे. यास्तव धर्माचा प्रमाणभूत आधार पुस्तक नसून मानवी अंतःकरण आहे.

परमेश्वर नेहमी कृपाळूच असतो. जो अत्यंत शुध्द अंतःकरणाची मदत मागतो त्याला ती निश्चितपणे मिळत असते. पैसा असणाऱ्या श्रीमंत आणि प्रतिष्ठित माणसाकडे आदराने पाहू नका जगातील सर्व आणि चांगल्या कामाची सुरुवात गरीबांकडूनच होते.

भयातून दुःख निर्माण होते. भयापोटी मृत्यू येतो आणि भयातूनच वाईट गोष्टी निर्माण होते. व्यक्तीमत्व सुंदर नसेल तर दिसण्याला काहीच अर्थ नाही. कारण सुंदर दिसण्यात आणि सुंदर असण्यात खूप फरक असतो. हा द्वेष, कपटवृत्तीचा त्याग करा व संघटीत होऊन ईतरांची सेवा करायला शिका. संपूर्ण जग हातात तलवारी घेऊन तुमच्या विरुध्द उभे टाकले. तरी ध्येयपूर्तीसाठी पुढे जाण्याची धमक तुमच्यामधे आहे.

''सत्यासाठी सर्व गोष्टींचा त्याग करावा. परंतु कोणत्याही कारणास्तव सत्याचा त्याग करु नये. ''

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी,१८६३ व मृत्यू ४ जुलै १९०२ आहे. या आयुष्यात स्वामींनी जे कार्य केले. ते कोणीही सहसा करु शकत नाही.

उठा, जागे व्हा !! जोपर्यंत यश मिळत नाही तोपर्यंत थांबू नका !

ध्येयासाठी जगणे, हे ध्येयासाठी मरण्यापेक्षा कठीण आहे. कार्यशक्ती आणि इच्छा शक्ती प्राप्त करा. खडतर करा म्हणजे तुम्ही निश्चित ध्येयाप्रत पोचू शकाल.

मी त्या देवाचा सेवक आहे.ज्याला अज्ञानी मनुष्य म्हणतात.

शक्यतेची सीमा जाणून घेण्यासाठी अशक्यतेच्या पुढे निघून जायला हवे.

सारी शक्ती तुमच्या आत दडलेली आहे. तुम्ही काहीही आणि सारे काही करु शकता.
'' सामर्थ्य हे जीवन तर दुर्बलता म्हणजे मृत्यू''
तुमच्या विचारांप्रमाणे तुम्ही घडता, तुम्ही जर स्वतःला दुर्बल समजलात तर दुर्बल बनाल आणि सामर्थ्यशाली समजलात तर सामर्थ्यशाली बनाल.

देवाला जर आपण आपल्या अंतःकरणात आणि प्रत्येक जिवंत व्यक्तीत शोधू शकलो नाहीत, तर त्याला शोधायला जाणार कोठे ?
एक काम करत असताना एकच काम करा. आपले सर्वस्व त्यात अर्पण करा. इतर सारे काही विसरुन जा. दिवसभरातून एकदा तरी स्वतःशी संवाद साधा. तसे केले नाहीत तर तुम्ही या जगातील एका चांगल्या व्यक्तीला भेटण्याची संधी गमवाल.

स्वामी विवेकानंदाचे कार्य, धर्म अध्यात्म त्यांचे गुरु व त्यांचा प्रभाव म्हणजे रामकृष्ण परमहंस त्यांच्या आईचे नाव भुवनेश्वरी नंदलालजी बसु त्यांचा मृत्यू झाला शुक्रवार ४ जुलै १९०२ बेलूर कोलकाता येथे झाला. नरेंद्रनाथांनी आपल्या घरीच शिक्षणाची सुरुवात केली. नंतर १८७१ साली ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या मेट्रोपॉलिटन इन्स्टिट्युशनमध्ये प्रवेश घेतला आणि ते १८७९ मध्ये प्रेसिडेन्सी कॉलेजची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाले. १८८१ साली ते फाइन आर्टची आणि १८८४ मध्ये बी.ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

नरेंद्रनाथांनी डेव्हिड ह्यूम, इमॅन्युएल कान्ट, गोत्तिलेभ फिन्शेबारुच स्पिनोझा, जार्ज हेगेल ,आर्थर शोपेन हायर, ऑगस्ट कोम्ट, हर्बर्ट स्पेन्सर , जॉन स्टुअर्ट मिल आणि चार्ल्स डार्विन इत्यादी विचारवंताच्या लेखनाचा अभ्यास केला होता.

प्राचार्य डॉ.विल्यम हेस्टी यांनी म्हटले आहे की,नरेंद्र खरोखरच , बुध्दिमान आहे. मी खूप फिरलो. जग पाहिले आहे. परंतु त्याच्यासारखी प्रतिभा आणि बुध्दि सामर्थ्य असलेला मुलगा अगदी जर्मन विद्यापीठातल्या तत्वज्ञानाच्या विद्यार्थ्यां–मध्येही मला बघायला मिळाला नाही. त्यांना 'श्रुतिधारा'म्हटले जात असे. एवढ्या तरुण मुलाने एवढे वाचले असेल असे मला वाटले नव्हते. '' असे महेंद्रलाल सरकारांनी त्यांच्याशी चर्चा केल्यावर म्हटले होते.

''विवेकानंद यांचे नामकरण '' राजा अजितसिंग खेत्री यांनी १० मे १८९३ रोजी स्वामीजींना विवेकानंद असे नाव दिले.

विवेकानंद हे हिंदू तत्वज्ञानाच्या ''वेदान्त'' शाखेचे पुरस्कर्ते होते. आद्य शंकराचार्य यांच्या विचारांना पुढे नेले त्यांनी हे तत्वज्ञान प्रतिपादित केले.

त्यांच्या मते.... सर्व प्रामाणिक शिवाचे अंश आहेत. त्यामुळेच 'शिवभावे जीवसेवा 'हे रामकृष्ण यांचे वचन त्यांनी शिरोधार्त मानले.

प्रत्येक जीव हा मूळ रुपातच ईश्वरी /दैवी आहे. अंतर्गत आणि बाह्य स्वभावावर नियंत्रण मिळवून त्याच्यातील दैवी अंशास जागृत करणे हे आपले ध्येय आहे.

उठा, जागे व्हा, आणि आपले ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका.

'दरिद्री नारायण'हा शब्द विवेकानंदानी जगाला दिला.
स्वामी विवेकानंद म्हणतात –

बहुरुपे सम्मुखे तोमार छावि
कोधाय खूंजिछो ईश्वर
जीवे प्रेम करे जेई जन
सेई जन से विछे ईश्वर

ईश्वर अनेक रुपाने तुझ्या समोर उभा आहे, ते सोडून तु कुठे ईश्वराला शोधतोस ? जे कोणी प्राणिमात्रांवर प्रेम करतात, तेच ईश्वराची (खरी ) सेवा करतात.

✻ शिक्षण संदर्भातील विचार :–

शिक्षण म्हणजे एखाद्याच्या अंगी अगोदरपासून असलेल्या पूर्णत्वाचा अविष्कार होय. विद्यार्थी जर शाळेत येत नसेल शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडे गेले पाहिजे.

खरचं स्वामी विवेकानंद एक प्रेरणास्त्रोत आहे. जो निर्मळ पाण्यासारखा वाहत आहे. ज्याला कोणतीच दिशा नाही फक्त तरुणांचे मन जिंकण्याची एक आशा आहे.
स्वामी विवेकानंद

आयुष्य
आयुष्य ही एक फार अवघड शाळा असते .

आपण कोणत्या वर्गात आहोत
हेच आपल्याला माहीत नसते
पुढची परिक्षा कोणती याची कल्पना नसते.
आणि कॉपीही करता येत नाही.
कारण ---
येथे प्रत्येकाची प्रश्नपत्रिका ही वेगळीच असते
दोस्ती
विश्वास की डोर है दोस्ती,
बेताब दिल की मजबुरी है दोस्ती
ना मानो तो कुछ नहीं और
मानो ते खुदा की भी कमजोरी
है दोस्ती .....

– वामन सोनाली भाऊसाहेब
(टी.वाय. बी. कॉम.)

## आज पाऊस पुन्हा तुझी आठवण देऊन गेला

आज पाऊस पुन्हा तुझी आठवण देऊन गेला,
ढगांना तुझ्या नयनांचे काजळ लावून गेला,
आकाशमध्ये तुझा रंग उधळून गेला,
आज पाऊस पुन्हा तुझी आठवण देऊन गेला
पाण्याच्या थेंबामध्ये तुझा स्पर्श लपवून गेला,
गडगडणाऱ्या ढगांमध्ये तुझे शब्द गुंतवून गेला,
आज पाऊस पुन्हा तुझी आठवण देऊन गेला
वाऱ्यामध्ये तुझा गंध पसरुन गेला,
मनात तुझा विरह जागवून गेला,
आज पाऊस पुन्हा तुझी आठवण देऊन गेला

## अंधश्रध्दा निर्मूलन



अंधश्रध्देला गाडून टाका
अंधश्रध्देला फाडून टाका
जादूटोणा करणी धरणी
हे वेड मनातून काढून टाका ....।।१।।
अंधश्रध्देचे पाय छाटा
अंधश्रध्देला हात छाटा
अंधश्रध्देने दानधर्म करणे
आहेत या बोथट वाटा ।।२।।
अंधश्रध्देला कोठून आली
अंधश्रध्दा साठून गेली
भोळ्या भाबड्या मनामध्ये
अंधश्रध्दा गोठून गेली...।।३।।
अंधश्रध्देला कोण मानतो
अंधश्रध्दा निरदार पाळतो. ।।४।।
अंधश्रध्देला मनात ठेवून
अंधश्रध्दा काल ही होती
अंधश्रध्दा आजही आहे
अंधश्रध्दा उद्याही राहील
अंधश्रध्दा एक पाया आहे. ।।५।।
अंधश्रध्देचे करु निर्मूलन
अंधश्रध्देचे करु विसर्जन
अंधश्रध्देला अग्नी देऊन
अंधश्रध्देचे करुया दहन ।।६।।
– रुतिका करांडे (एफ,वाय,बी कॉम)


# संत गाडगेबाबा व्यक्ति आणि कार्य

देबूजी झिंगराजी जानोरकर यांना गाडगेबाबा म्हणत. एक सन्त एवं समाज सुधारक होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ व मृत्यू २० डिसेंबर १९५६ एक थोर आधुनिक मराठी संत व समाजसुधारक त्यांचा जन्म शेणगाव (जि. अमरावती) येथे परीट जातीत झाला. वडिलांचे नाव झिंगराजी व आईचे नाव सखूबाई आडनाव जाणोरकर त्याचे मूळनाव डेबूजी असे होते तथापि त्यांचा वेश म्हणजे अंगावर फाटकी गोधडी आणि हातात गाडगे असा असल्यामुळे लोक त्यांना 'गोधडे महाराज' किंवा 'गाडगे महाराज' म्हणूनच ओळखत १९१२ मध्ये त्यांचा कुंताबाईशी विवाह झाला. परंतु संसारात त्यांचे मन रमले नाही. पुढे काही वर्षांनी घर सोडून तिर्थयात्रा करीत ते फिरु लागले .समाजातील कमालीच अज्ञान अनिष्ट चालीरीती व अंधश्रध्दा पाहून त्यांनी निरपेक्ष लोकसेवेचे व लोकशिक्षणाचे व्रत स्वीकारले.

लहानपणापासूनच त्यांना भजन-कीर्तनांची आवड होती आणि त्यांची वृत्तीही धार्मिक व परोपकारी होती. समाजसुधारणेसाठी व लोकशिक्षणासाठी त्यांनी कीर्तनाचे माध्यम प्रभावीपणे वापरले. ते निरादार असले तरी त्यांची भाषा सुबोध व सर्वसामान्यांच्या एकदम हृदयाला जाऊन भिडणारी होती. महाराष्ट्रात सर्वत्र तसेच गुजरात , कर्नाटक व आंध्र प्रदेशाच्या काही भागात त्यांनी गावोगाव कीर्तने करुन लोकजागृती केला. त्यांचा नैतिक उपदेश साधा व सर्वसामान्य उपयुक्त ठरावा असाच होता.

चोरी करु नये, कर्ज काढून चैन करु नये,दारु पिऊ नये,देवापुढे पशुंचा बळी देऊ नये. अशा प्रकारचा उपदेश ते आपल्या कीर्तनांतून मार्मिक उदाहरणे देऊन करीत. पारंपारिक पारमार्थिक विषयांसोबतच व्यावहारीक व नैतिक विषयांचाही त्यांनी आपल्या कीर्तनांतून लोकजागृतीसाठी चांगला उपयोग करुन घेतला.

स्वच्छता, प्रामाणिकपणा व भूतदया यांवर त्यांचा विशेष भर असे. तीर्थयात्रेच्या ठिकाणी ते जात परंतु



देवदर्शन न घेता मंदिराच्या बाहेर थांबून यात्रेकरुंची सेवा करीत व तेथील परिसर स्वतःच्या हातांनी स्वच्छ करी. खाण्यापिण्याच्या बाबतीतही त्यांचा कमालीचा साधेपणा होता. श्रीमंत भक्तांनी दिलेले चांगले अन्न ते भिकाऱ्यांना वाटून टाकीत आणि स्वतःगरिबाच्या घरची चटणी-भाकरी मागून आणून खात.

लहानपणापासूनच ते जातिपंथभेदातीत होते. जातिभेद नष्ट करुन एकजिनसी समाज निर्माण व्हावा. असे त्यांना मनापासून वाटे व त्या दृष्टीने यांचे आचरण आणि प्रयत्नही असत. पंढरपूर , नासिक, त्र्यंबकेश्वर, आळंदी इ. ठिकाणी यात्रेकरुंचे अत्यंत हाल होत. म्हणून त्यांनी त्यांच्या सोयीसाठी प्रशस्त धर्मशाळा बांधल्या. विदर्भातील ऋणमोचन येथे त्यांनी लक्ष्मीनारायणाचे मंदिर उभारले व नदीवर घाटही बांधला. अनेक ठिकाणी त्यांनी गोरक्षण संस्थाही उभारल्या. तसेच अनाथांसाठी व अपंगासाठी अनेक प्रकारे कार्य केले. समाजसेवा करणाऱ्या अनेक संस्थांनाही त्यांनी उदार हस्ते देणग्या दिल्या.

अनेक ठिकाणी देवाधर्माच्या नावावर चालणारी पशुहत्या त्यांनी बंद केली. अध्यात्माच्या जंजाळात न शिरताही संसारातच राहून ईश्वरभक्ती करता येते. अशी साधी व सरळ शिकवण त्यांनी समाजास दिली.

संत तुकाराम महाराज आमचे गुरु आहेत व माझा

कोणीही शिष्य नाही असे ते म्हणत. त्यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांची गादी अथवा मठ कोठेही निर्माण झाला नाही.

समाजात शिक्षणप्रसार करुन अनेक शिक्षणसंस्थांना त्यांनी मदत केली लोकांची त्यांच्यावर नितांत श्रध्दा होती त्यामुळे लोकांनी त्यांना पैसा दिला. तो सर्व त्यांनी लोकोपयोगी कार्यात वेचला. त्यांनी उभारलेल्या सर्वच संस्थांचा कारभार विश्वस्त मंडळेच पाहतात.

गाडगे महाराजांविषयी बहुजन समाजात कमालीचा आदरभाव आहे. त्यांनी महाराष्ट्रात केलेले लोकजागृतीचे व लोकसेवेचे कार्य अत्यंत मोलाचे आहे प्रवास करीत असता अमरावती जवळ त्याचे अचानक निधन झाले त्यांची समाधी अमरावती येथे आहे.

**– ऋतिका करांडे (एफ.वाय. बी.कॉम.)**

# अंधश्रध्दा




माणसापेक्षा दगड जपले जातात येथे
खरे तर अंधश्रध्देने पुजले जातात येथे
ठेवती जीवंतपणी उपाशी मायाबापास
पंच पक्वान्न श्राध्दात वाढले जातात येथे
आधुनिक युगात तंत्रज्ञानसिध्द यंत्राच्या
उद्घाटन नारळ वाढविले जातात येथे
विसरुन शास्त्र आधुनिक विज्ञान वाटा
रुढी परंपरा प्रमाण मानले जातात येथे
चाललोय जगी मंगळावरी होऊनी यान
उतार धुपारे आजती केले जातात येथे

**– दिपाली धाडगे (टी.वाय. बी.कॉम.)**

# प्रेम एक आभास




प्रेम एक आभास
सुंदर तिचे डोळे मला, करत होते इशारे
मन माझे म्हणाले, सांभाळ तू खिसा रे
कळलं मला, खोटं बोलली
मी तुझी खास रे
मन माझं ओरडत होतं, हा तर टाइमपास रे
म्हणाली मला, भेटू या का
आज आपण बागेत रे ?
नंतर कळले तिचा होता
पाणीपुरीचा बेत रे
सहवास तिचा आवडु लागला
आले माझ्या ध्यान्यात रे
प्रेमाचे फुल उमलु लागले
हळूहळू माझ्या मनात रे
एके दिवशी जवळ आली
म्हणाली नाही विसरायचं रे
लग्न माझं पुढच्या महिन्यात
तू नक्की यायचं रे
सुंदर माझं जग ते, झाले उध्वस्त क्षणात रे
सनईचे सूर झाले बेसुर,
वाजू लागले कानात रे
हसत टाटा म्हणत, गेली ती पाठमोरी रे
वाटलं जणु फिरवून गेली
हृदयावर माझ्या सूरी रे
ती दिसते ती हसते खोटे, सारे भास रे
प्रेम –बीम सगळे खोटे, फसवे ते आभास रे

**– रणदिवे शुभांगी राजेंद्र (एस.वाय.बी.कॉम.)**

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे

पृथ्वी (वसुंधरा) बदल कृतज्ञता व्यक्त करताना भारतीय संस्कृतीने पृथ्वीला मातेचे स्थान दिलेले आहे. १९७० साली न्युयॉर्कमध्ये पहिला वसुंधरा दिन साजरा करण्यात आला. १९७२ मध्ये स्टॉक होम येथे मानवी पर्यायवरणावर आणि त्यानंतर रिओ–द–जानेरो येथेही १९९२ मध्ये पृथ्वी परिषद झाली. या परिषदांनी संपूर्ण जगाला पर्यायवरणाचे रक्षण आणि शाश्वत विकासासाठी एकत्रितपणे विचारमंथन करण्यास भाग पडले. तसे पाहिले तर पर्यावरण ही नवी संकल्पना नाही. भारतीय संस्कृतीने पृथ्वीला दिलेले मातेचे स्थान तसेच पृथ्वीवरील सर्व नैसर्गिक घटकांसोबतचे साहचर्य टिकवण्याची शिकवणही दिली आहे.

जागतिक वसुंधरा दिन साजरा करण्याच्या हजारो वर्ष आधी वेदांनी वृक्षतोड विरुध्द जागृती केली. भारतीय संस्कृतीत नवीन इमारत, नवीन घर बांधण्यापूवी एखाद्या कार्यक्रमासाठी मंडप घालण्यापूर्वी भूमीपूजन केले जाते. शेतकरीही जमीनीची नांगरणी करण्यापूर्वी भूमीपूजन करतो. पृथ्वीला मातेचे स्थान देणारी आमची भारतीय संस्कृती महान आहे. २२ एप्रिल जागतिक वसुंधरा दिनानिमित्त जगभरात पर्यावरण जागृतीसाठी विविध कार्यक्रम केले जातात. मानव हा निसर्गव्यवस्थेतील एक घटक असून ही पृथ्वी फक्त मानवासाठी नाही तर समस्त पशु, पक्षी, प्राणी, वनस्पती, वृक्षसंपदा, जीवजंतूसाठी आहे. जीवनाचा मूलधार असलेली अद्‌भूत निसर्ग व्यवस्था मोडीत काढुन माणूस कधीही सुखी, समाधानी व समृध्द होणार नाही याचे भान राखणे हीच वसुंधरेची खरी सेवा आहे. मुख्य म्हणजे निसर्गव्यवस्था आपल्या भरण–पोषण, आनंद, आरोग्य व सकल सुखासमाधानासाठी जी उत्पादने व सेवासुविधा समस्त वनस्पती व प्राणी जगतला सहज




पुरविते ज्याचे मोजमाप पैशात होत नाही  म्हणून ती मौलिक नाही असा होत नाही. वातावरण, जीवावरण, जलावरण , भूसार व आकाश या पंचतत्वांची किमया आहे.

मानवाने स्वार्थासाठी निसर्गाला ओरबाडुन त्याचा बळी घेण्याचा सपाटा लावला आहे. कोणत्याही परिस्थितीत तो थांबायला तयार नाही म्हणून निसर्ग अनेकदा उग्र रुप धारण करुन मानवाला दुष्काळ, महापूर, भूकंप, गारपीट, सुनामी अशा संकटात लोटीत असतो. जगभरात २२ एप्रिलला ४८ वा जागतिक वसुंधरा दिन साजरा झाला. या वसुंधरा दिनाच्या निमित्ताने आता प्रत्यक्ष कृती करत निसर्गाला अभय देण्याची वेळ आलेली आहे. पर्यावरण संरक्षणासाठी काम करणे ही आपणा सर्वांची बांधीलकी आहे. वृक्षलागवड,वृक्षसंगोपन, प्रदुषण नियंत्रण,कचरा,व्यवस्थापन इंधन, बचत, सौरऊर्जा वापर इ. उपायांनी वसुंधरेला तिचे गतवैभव प्राप्त करुन देण्याची जबाबदारी समस्त मानवजातीची आहे.

''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी'' ही संत तुकरामांच्या अभंगातून दिलेली शिकवण अंगीकारण्यास निसर्गाची जाण ठेवून त्याला आपले मित्र मानल्यास पर्यावरण संवर्धन होण्यास मदत होईल. वृक्ष लागवडीचा देखावा न करता वृक्षसंवर्धन जतन करणे महत्वाचे आणि सुक्ष्म समाधान देतात.

**कु. मुळे वृषाली बाळासाहेब (टी.वाय.बी. कॉम.)**

# वेध भविष्याचा



क्राईम डेटाबेससचे भवितव्य

हिंसक गुन्ह्याविना जगाची तुम्ही कधी कल्पना तरी केली आहे का ? अलिकडेच, आपण शक्तीमान डेटाबेससमार्फत गुन्हेगारीचे प्रमाण कमी केले आहे. महत्वाचा भाग असा आहे की, देशात राहणाऱ्या प्रत्येकांकडून डेटाबेससना महत्वाची व्यक्तीगत माहिती हवी असते. तंत्रज्ञान अधिक चांगले क्राइम डेटाबेसेस तयार करत आले आहे, आणि आपण भविष्यावर नजर ठेवून असतांना आपले आयुष्य सुधारण्यासाठी ते उत्क्रांत होणे चालूच राहिल.

सध्या ,युनायटेड स्टेटस सारख्या अनेक देशांतील नॅशनलक्राइम डेटाबेसेस ज्यांनी गुन्हे केले आहेत अशा व्यक्तींच्या बाबतीत डेटा ठेवण्यावर लक्ष केंद्रीत करत आहेत. अशा डेटाबेससमध्ये केवळ नाव आणि जन्मतारीख अशी मूलभूत माहितीचे नसते तर त्यात बोटांचे ठसे, छायाचित्रे आणि अगदी डी.एन.ए. नमुने सुद्धा असतात. त्यामुळे गुन्हेगार डेटाबेसमध्ये आधीच असल्याचे गृहीत धरु, गुन्हा घडल्यानंतर तो कोणी केला याचा अंदाज बांधणे अधीक सोपे झाले आहे. जरी शेवटी गुन्हेगार पकडला जात असला तरी निरागस पिडीतासाठी फार उशीर झालेला असतो. या कारणास्तव संशोधक सध्या डेटाचा संग्रह विस्तारित करण्याची आणि नंतर भविष्यात असे हिंसक गुन्हे करण्यासाठी कोण सक्षम आहे याचा अंदाज करण्यासाठी शक्तीमान प्रोगाम्स वापरण्याची शक्यता आजमावून पाहत आहेत.

गेल्या काही वर्षात बालपणातील छळांपासून ते सद्याच्या रोजगाराच्या स्थितीपर्यंतच्या डेटाचे विश्लेषण करतात. सामान्यपणे हिंसक, गुन्हेगारी वर्तनाकडे घेऊन जाणारे अनेक घटक शोधुन काढणे हे त्यांचे लक्ष आहे.

अनेक वर्षापासून, क्रिमिनल डेटाबेसेस विस्तारित होत आहेत. तथापि, युनाइटेड स्टेटस् मध्ये,प्रत्येक राज्याची संकलित करण्याचा डेटा आणि तो कोणाकडून संकलित करायचा हे निश्चित करण्याची क्षमता आहे.

त्याच्याही पुढे म्हणजे, सरकारला त्या व्यक्तीबाबत माहिती असणाऱ्या –शाळा,व्यवसाय विमा कंपन्या, आणि औद्योगिक तसेच वैद्यकीय व्यवसाय यामधील डेटाबेससह सर्वर डेटाबेसचा वापर करता येणे शक्य झाले आहे.

गुन्ह्याचा अंदाज करणारे प्रोग्राम विकसित करता येतील असे मानल्यास संकलित करणे आवश्यक असलेल्या डेटाच्या प्रकाराला कायदेशीर आव्हाने दिली जातील. व्यक्तींना गुन्हे कमी करण्याच्या शक्यतेनुसार त्यांचा खाजगीपणा तोलुन पहायला सांगितला होता.

अपरिहार्यपणे आपला सरकारचाही विश्वासही चित्रात येईल. अशा प्रकारच्या भविष्यातील डेटाबेसबाबत तुम्ही काय विचार करता ?

**– शिरसाठ सतिश बंडू (टी.वाय बी.सी.एस.**

# भ्रष्टाचार एक समस्या

''भ्रष्टाचार'' या शब्दाचा खरा अर्थ
''भ्रष्ट+आचार''

भ्रष्टा म्हणजे आपल्या देशाविषयी कर्तव्याची जाण नसणार...

आचार म्हणजे वाईट नितिमत्तेने कमवलेले धन ...

भ्रष्टाचार वाढण्याचे मुळ कारण आपल्या देशाची मूठ ही स्वार्थी अपप्रवृत्तीच्या लोकांच्या हातात आहे. यामध्ये मला कोणत्याही व्यक्ती/संघटनेला दोष द्यायचा नाही. जर प्रत्येक भारतीयाने आपण भारतीय असल्याची जाण ठेवून मी भ्रष्टाचार करणार नाही व करुन देणार नाही. याचे पालन जर प्रत्येकाने केले तर नक्कीच जगातील सर्वात मोठा महासत्ताधिश देश म्हणून उदयास येईल यात तीळमात्र ही शंका नाही.

संपुर्ण जगामध्ये भ्रष्टाचारावर नजर ठेवणारी संस्था ''ट्रांसपेरेंसी इंटरनॅशनलच्या सर्वे''नुसार भारताचे ४० गुणासह ७६ वे स्थान आहे. भारत दिवसेंदिवस विकसित राष्ट्र बनण्याकडे वाटचाल करत आहे. परंतु आपल्या समोर आजही अनेक गंभीर समस्या आहेत. त्यामध्ये वाढती लोकसंख्या,बेराजगारी, गरीबी या सोबतच भ्रष्टाचार ही आपल्या देशासमोरील गहन समस्या आहे. अगदी सरकारी शिपायापासून ते मोठमोठ्या राजकीय नेत्यापर्यंत अनेक लोक भ्रष्टाचाराला खतपाणी घालत आहेत. आज भारतात कोणतेही छोट–मोठे काम करायचे झाले तर आपल्याला समोरच्याला थोडेफार चहापाणी द्यावेच लागते. कोणालाही ज्यात वावगही वाटत नाही पण कळत नकळत आपणही भ्रष्टाचाराला बढावा देत असतो.

भ्रष्टाचाराची सुरुवात झाली कशी व कोठून ह्याबद्दल कोणालाही फारशी माहिती नाही. पण त्याचा प्रत्यक्षात उगम हा बिटीश काळातच झाला होता. त्यांनी आपल्या देशातील राजे, महाराजे यांना आमिष दाखवून व आपल्या वेठीस धरुन व्यवसाय करण्याच्या बहाण्याने सर्व सामान्य माणसाला गुलामी पत्करण्यास भाग पडले व पुढे आपल्या भारत देशावर १५० वर्ष राज्य केले व



त्याच्यानंतर भ्रष्टाचार करण्याचा वारसा हा आपल्या देशातील राजकारणी, सरकारी बापू व ठराविक पोलिस वर्ग चालवत आहे.भारत देशाने हरितक्रांती साध्य केली. आधुनिक युगातील महत्वाच्या क्षेत्रातही लक्षणीय प्रगती केली पण आपल्या देशातील कोट्यावधी जनतेच्या प्राथमिक गरजाही आपण आज पूर्ण करु शकत नाही. याचे मुळ कारण देशातील वाढता भ्रष्टाचार...

एखादी व्यक्ती / संघटना आपल्या पदाचा अधिकाराचा गैरफायदा घेऊन कमीत कमी मेहनत घेऊन जास्तीत जास्त नफा कमविण्याच्या उद्देशाने भ्रष्टाचार करत असते. या सर्वामध्ये सर्वसामान्य भरडला जातो.भ्रष्टाचारहा एखाद्या मधमाश्याच्या पोळ्याप्रमाणे असतो. त्यामधील गोड पदार्थ मध म्हणजे हाव, लालच ,पैसा याकडे माणूस आकर्षित होतो. परंतु पोळ्यावरील माशा जर चावल्या तर जीवन जगणे ही मुश्कील करतात. त्याचप्रमाणे माणूस पैसा कमविण्याच्या हव्यासापोटी देशाप्रती सामाजिक भान न ठेवता व आपण देशाला काहीतरी देण लागतो याची जान न बाळगता देशाविरोधी कृत्य करत आले तर समाजामध्ये किती नाचक्की होईल याची कल्पना नसते.

आपण सामान्य माणूस नकळतपणे भ्रष्टाचार वाढण्यास मदत करत असतो. आपण सुद्धा तेवढेच गुन्हेगार जेवढा लाच मागणारा माणूस . सामान्य माणुस लाच देतो म्हणून समोरचा माणूस लाच देतो म्हणून

समोरचा माणूस घेतो किती नकळतपणे गुन्हा करत असतो. उदा. आपले एखादे काम साध्य करण्यासाठी सरकारी कार्यालयातील अधिकारी यांना टेबलाखालुन लाच देऊन आपले काम साध्य करतो. तसेच जर रस्त्यावरुन जात असताना पोलिसांनी अडविले असता आपण १००-१५० रु देऊन तेथून निघुन जातो. नोकरी मिळवायची दया, पैसे, शाळा - महाविद्यालयात प्रवेश मिळवायचा द्या पैसे,निवडणुकांमध्ये मतदारांना पैसे वाटुन मत खरेदी केले जातात नंतर मग आपणच या भ्रष्टव्यवस्थेला नावे ठेवतो. मला तर नवलच वाटते... आपण देवाला ही यामधुन सोडले नाही मंदिरामध्ये दर्शनासाठी गेले असता पैसे देऊन दर्शन घेतले जाते देवाला तरी आवडेल का हे ?

मला तर गंमतच वाटते की ते लोक भ्रष्टाचार करतात तेच आंदोलन करतात ओरडतात की याने एवढ्या कोटींचा भ्रष्टाचार केला तुम्हाला तर नवल वाटेल आपल्या भारत देशातून स्विस बँकेमध्ये तब्बल २८० लाख कोटी काळ्या पैशाच्या स्वरुपात देशातील राजकीय उद्योजक, अभिनेते, खेळाडू, सरकारी इ. क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या बँक खात्यात जमा आहे. असे स्विस बँकेने सांगितले आहे ही एवढी रक्कम की या पैशातून भारत देशाच पुढील ३० वर्षाच बजेट विना टॅक्स चालू शकेल. एवढ्या मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करुन गरीब जनतेचे पैसे भारताबाहेर नेले आहे अरे किती खाल? भसम्या झाला आहे का ? खाऊन खाऊन पोट फुटेल पण तुमची भूक काय मिटणार नाही. आपणच अभिमानाने म्हणतो की,

''भारत माझा देश आहे ,
सारे भारतीय माझे बांधव आहे .''

अरे मग कोठे गेल देशाविषयी प्रेम कोठे गेली आपल्या देशातील लोक आपल्याच लोकांचे पाय ओढतात मग कसा होईल देशातील लोकांचा व देशाचा विकास ? मला तर लाज वाटते भ्रष्ट व्यवस्थेची आपल्या देशाचे माजी राष्ट्रपती स्व. अब्दुल कलाम यांनी भारत देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न बघितले होते पण जोपर्यंत आपल्या देशातील भ्रष्टाचार हा मुळासकट नष्ट होत नाही तोपर्यंत भारत महासत्ता होणार नाही . आपल्या देशाला लाभलेले थोर समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांनी आपल्या वयाच्या ७० व्या वर्षी भ्रष्टाचार दूर करण्यासाठी आंदोलन करुन जनलोकपाल बील मंजूर केले. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदींनी आपल्या भारत देशात ८ नोव्हेंबर२०१६ रोजी संपूर्ण देशात ५००/- व१०००/- रु.नोटाची नोटाबंदी करुन भ्रष्टाचाराविरुध्द कठोर पाऊल उचलले हे सर्व तोपर्यंत थांबणार नाही जोपर्यंत ह्या देशातील प्रत्येक नागरीक आपली सामाजिक जबाबदारी उचलणार नाही.

भ्रष्टाचार निर्मूलनासाठी समाजातील घटकांचे मन परिवर्तन त्याविषयी आवश्यक उपाय योजना करणे आवश्यक आहे.

भ्रष्टाचार कलम १९८८ नुसार कठोर कारवाई ...लहानपणापासून भ्रष्टाचार विरोधी शिक्षण हे माता, पिता, गुरु यांनी देणे आवश्यक....देशातील सर्व सरकारी कार्यालयात सी.सी. टि.व्ही. कॅमेरे लावून त्यांच्या कामावर लक्ष ठेवणे.

समाजातील लोकांच्या विचार सरणीत बदल आवश्यक न्याय प्रणालीमध्ये वेग (स्पिड जजमेंट,फास्ट टैक कोर्ट) रोख व्यवहारावर मर्यादा

देशातील सर्व मोठे व्यवहार रोख स्वरुपात न करता ऑनलाईन पद्धतीने करण्यास प्राधान्य मी भ्रष्टाचार करणार नाही व करु ही देणार नाही अशी मानसिकता तयार करणे ...

जर प्रत्येक भारतीयाने मनाशी ठरवले की थोडे कष्ट पडले तरी चालतील पण मी चुकीचे वर्तन करणार नाही अशी प्रवृत्ती जोपर्यंत आचरणात आणत नाही तोपर्यंत आपला भारत भ्रष्टाचार मुक्त होणार नाही. आपल्या भारताची प्रगती व्हावी अशी वाटत असेल तर आजपासून सर्वांनी प्रतिज्ञा करावी कि मला कितीही त्रास पडला कामाली कितीही वेळ लागला तरी मी भ्रष्टाचार करणार नाही व इतरांनाही करु देणार नाही.

।।जय हिंद जय भारत ।।
।। भ्रष्टाचार मुक्त भारत ।।

**- ओंकार ठाणगे (एफ.वाय.बी. कॉम.)**

## आई मला जन्म घेऊ दे

तू जसे पाहिले जग मला देखील पाहु दे
नको मारु आई मला जन्म घेऊ दे
परमेश्वर प्रत्येकाच्या घरी जाऊ शकत नाही
त्याच्या जागी तू आहेस कसे तुला कळत नाही
ताईसवे माझ्या मला आनंदाने न्हाऊ दे
नको मारु आई मला जन्म घेऊ दे
हुंडा लागतो मोठा म्हणून त्रास माझा वाटतो कां ग
झरा तुझ्या मायेचा म्हणून असा आटतो
राखीसाठी दादाच्या निदान मला येवू दे
नको मारु आई मला जन्म घेऊ दे
तू बहिण तू कन्या तू एक स्त्री आहे
काल जिथे  तू होती आज तिथे मी आहे.
तू जसे विणले नाते तसे मला विणू दे
नको मारु मला आई मला जन्म घेऊ दे
पहा मग फिरुन मी पुन्हा कधी येणार नाही
भाग्य कन्यादानाचे आई तुला देणार नाही
डोळे येता भरून तुझे पदर मला होवू दे
नको मारु आई मला जन्म घेऊ दे

– खटावकर वैष्णवी ज्ञानेश्वर

## आत्महत्या हा पर्याय नाही

अपयश ही यशाची पहिली पायरी असते.
जीवनातील अनुभवांची ती एक डायरी असते.
त्यातुनच घडत जाते क्षण
प्रत्येकाचे भविष्य मगच कळुन येते
किती सुंदर आहे आयुष्य
प्रयत्नांच्या बळावर सर करता येते शिखर
लाथ मारेन तिथे पाणी काढेन हि ठेवा जिगर
कुठल्याही समस्योला नाही आत्महत्या हा पर्याय
सदा पुढेच जायचे संकटावर ठेवुन पाय
नापास होणं म्हणजे नाही आभाळ कोसळणं
जीवन म्हणजे आहे निरंतर शिकणं
परीक्षा नाही ठरवू शकत जीवनाचा मोल
अंगी बाळगावी कला अन् सावरावा तोल
दुर्गम कडा भेदण्याची ठेवा दुर्दम्य अभिलाषा
मग येणारच नाही तुमच्याजवळ निराशा ...
प्रयत्न हा यशाचा पर्याय आहे
आत्महत्या हा पर्याय नाही
हसत खेळत आयुष्य संपायच असतं.

– भिंगारदिवे क्रांती

## वडील



वडील म्हणजे संयमाचा घाट ...
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई
त्याच शिदोरीची सोय ही वडीलच पाही....
देवकी - येशोदेच  प्रेम मनात साठवा
टोपलीतून बाळास नेणाऱ्या वासुदेवही आठवा..
काटकसर करुन मुलांना देतात पॉकेटमनी
वडील मात्र वापरे शर्ट-पॅन्ट जुनी...
मुले असतात आपल्या विश्वास मग्न
वडीलांना दिसते मुलांचे शिक्षण,लग्न...
जिवनभर मुलांच्या पाठी वडीलांच्या सदिच्छा
त्यांनी समजुन घ्यावं हीच सदिच्छा ...

– वैष्णवी दत्तात्रय धाडगे
(एस.वाय.बी.कॉम.)

# आई म्हणजे ?



आई म्हणजे
आई साठी काय लिहू
आई साठी कसे लिहू
आई साठी पुरतील एवढे
शब्द नाहीत कोठे
आई वरती लिहिण्या इतपत
नाही, माझे व्यक्तिमत्व मोठे
जीवन हे शेत आई म्हणजे विहिर
जीवन ही नौका तर आई म्हणजे तीर
जीवन ही शाळा तर आई म्हणजे पाटी
जीवन हे कामच काम तर आई म्हणजे सुट्टी
आई तु उन्हामधली सावली
आई तु पावसातली छत्री
आई तु थंडीतली शाल
आता यावीत दुःखे खुशाल
आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
आई म्हणजे वाळवंटात प्यावं अस थंडगार पाणी
आई म्हणजे आरतीत वाजवावी
अशी लयबध्द टाळी
आई म्हणजे वेदनेनंतरची
सर्वात पहिली आरोळी,,,,
अस्तित्वाच इथे नांदण आहे.
संस्कारांच्या असंख्य चांदण्यांनी
हृदयाच्या आभाळावर गोंदण आहे.
आई, तुझ्य रागवण्यातही
अनुभवलाय वेगळाच गोडवा
तुझ्या मायेच्या नित्य नव्या सणात
फिका पडतो दसरा नि पाडवा

आठवतं तापाने फणाफणायचो तेव्हा
तू रात्रभर कपाळावर घड्या घालापचीस
सर्वत्र दिवे मिणमिणू लागायचे, तरी
तुझ्या डोळ्यातही ज्योत एकटीत लढायची
एकदा जरासं कुठे खरचटलो
आई, किती तू कळवळली होतीस
एक धपाटा, घालून पाठीत
जखमेवर फुंकर घातली होतीस
जखम ती पुर्ण बुजली आता
हरवून गेली त्यावरची खपली
तो धपाटा, ती फुंकर ती माया
ती हरेक आठवण मनात जपली
आई, किती ते तुझे निःस्वार्थ प्रेम
हृदयाच्या किती कप्प्यात साठवू मी
कितींदा नव्या हृदयाचा संदेश
देवाकडे क्षणाक्षणाला पाठवू मी
आई, हजार जन्म घेतले तरी
एका जन्माचे ऋण फिटणार नाही.
आई, लाख चुका होतील मज कडुन
तुझं समजावनं मिटणार नाही.
आई करोडोंनमध्ये जरी हरपलो
तरी तू मला शोधून काढशील
आई, तुला एकदाच हाक दिली
तरी अब्जांनी धावून येशील.

# आई-वडील

आई-वडील म्हणजे नक्की काय असतं ?
आयुष्य जगण्यासाठी देवाने दिलेलं
ॲडव्हान्स पाठबळ असतं...।।
तुमच्या प्रत्येक दिवसात,
त्यांनी आपलं स्वप्न पाहिलेल असतं,
तुमच्या जन्मापासून त्यांच्या मरण्यापर्यंत त्यांनी
आपलं आयुष्य खर्चलेलं असतं ।।
आई तुमच्या आयुष्याच्या गाडीचं योग्य
दिशा देणार स्टीयरिंग असतं..
तर अचानक आलेल्या संकटात सावरायला
''वडील'' म्हणजे अर्जंट ब्रेक चा पर्याय असतं ।।
आईचं प्रेम हे रोजच्या आयुष्यात कामाला
येणारं बँक बॅलन्स असतं।।
तर ''वडील'' म्हणजे गरजेच्या वेळी मिळणारा
तुमचा बोनस किंवा व्हेरिएबल पेमेंट असतं ।।
''आई'' म्हणजे तुम्हाला सतत जोडणार
मोबाईलचं नेटवर्क असतं ।।
आणि कधी नेटवर्क थकले
तर ''वडील'' अर्जंट एस.एम.एस. असतं ।।
''आई'' म्हणजे तुमच्या आयुष्यातलं,
ॲन्टीव्हायरस असतं।।
तर शोधून काढलेले व्हायरस संपवायचं
''वडील'' हे क्वारनटाईन बटण असतं।।
''आई''म्हणजे तुमच्या आयुष्यातलं
शिक्षणाचं विद्यापीठ असतं ।।
तर''वडील''म्हणजे तुमच्या आयुष्यातली
चालती बोलती अनुभवाची फॅक्टरी असतं।।
''आई'' म्हणजे तुमच्या आयुष्यातील
साठवलेली पुण्याई असते ।।
तर ''वडील'' म्हणजे कंबर कसून आयुष्यभर
मिळवलेली कमाई असते ।।
''आई''म्हणजे तुमच्या आयुष्यातला
मार्गदर्शक गुरु असतो ।।
तर दाखवलेल्या वाटेवर 'वडील' हा
जवळचा मित्र असतो. ।।
''आई''म्हणजे साक्षात भगवंत परमेश्वर असतो ..।।
तर त्या परमेश्वरापर्यंत पोहचवणारा
'वडील' एक संत असतो ।।
''आई''म्हणजे तुमचे शरीर मेंदू हृदय आणि मन असतं ।।
तर ''वडील'' म्हणजे भक्कम ठेवणारा पाठीचा कणा
आणि शरीरातलं हाड अन् हाड असतं ।।
कधी वेदना झाल्यास तोंडी वाक्य
''आई'' गं ऽऽऽऽ असतं।।
आणि भले मोठे संकट आले की,
''बाप रे बाप'' असतं ....।।
परमेश्वर समोर आला तरी राहायला वीट
फेकलंल पुंडलिकाचं मन असतं ....।।
त्याच्या आई-बापाच्या रुपात,
विठ्ठलाने स्वतःलाच तिथे पाहिलेल असतं।।
म्हणूनच म्हणतो ...
परमेश्वर अध्यात्म भगवंत हे सगळे
अजब गणित असतं...।।
त्या सगळ्यापर्यंत पोहचवणारं
''आई वडील'' हे कनेक्शन असतं ।।
आई-वडील म्हणजे नकळत मागे असलेली
मायेची सावली असते ।।
उगाच नाही आपल्या संस्कृतीत
''मातृ देवो भव'' अन् ''पितृ देवो भव''
असे म्हणलेल आहे....
खरंच आई-वडिलांच्या सेवेसाठी कधीही नाही म्हणू नका
कारण जग हे पाहतो. ते फक्त ''आई वडिलांमुळे ''
- रणदिवे शुभांगी राजेंद्र (एस.वाय.बी. कॉम.)

# मराठी विभाग अहवाल (सन २०१८-१९)

आमच्या मना मनात दंगते मराठी
आमच्या रंगा रंगात रंगते मराठी
लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी

मराठी ही आमची मातृभाषा. जिच्याद्वारे आम्ही विचार करतो, त्याच विचारातून कृती करतो आणि जिच्याद्वारे आम्ही आपापल्या भावना व्यक्त करतो ती मायबोली, मातृभाषा म्हणजे मराठी होय. शालेय जीवनापासून ते महाविद्यालयीन जीवनापर्यंत मराठी हा विषय घेऊन विद्यार्थी उत्तीर्ण होतात. पण तिच्याविषयी, प्रेम जीव्हाळा, आत्मीयता रुजविण्याची नितांत गरज आहे हे काम सर्व स्तरावर ज्या पद्धतीने होते. त्याच पद्धतीने या महाविद्यालयातही होताना दिसते.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून हा विभाग कार्यरत आहे. आरंभी सामान्य स्तरावर व नंतर विशेषस्तरावर हा विषय सुरु करण्यात आला. या विभागाच्या वतीने शै. वर्ष २०१८–१९ मध्ये प्रवेशित सर्व विषयांचे स्वागत समारंभ करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य होते. यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉ. मुळे बी. एम., सहकारी प्रा. सौ. डॉ. वर्षा कीर्तने व विद्यार्थी उपस्थित होते. या विभागाच्या वतीने ५ सप्टेंबर हा शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यात अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदविला तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांची मनोगते व विद्यार्थ्यांची मनोगत झाले.

याबरोबरच या विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्षात येणाऱ्या थोर नेत्यांच्या पुण्यतिथी व जयंती सोहळे साजरे करण्यात आले त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांचे आदर्शवत जीवनचरित्र व त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख यांची ओळख करुन देण्यात आली.

शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सत्रात सुंदर हस्ताक्षर, निबंध लेखन, काव्यवाचन, आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मराठी विभागातील विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील इतरही विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

सहमहाविद्यालयीन उपक्रमांसोबतच या विभागातील प्राध्यापक संशोधन विषयातही अग्रणी आहेत. विविध महाविद्यालयात होणाऱ्या चर्चासत्रामध्ये शोधनिबंध वाचनही या विभागातील प्राध्यापकांनी केले आहे व त्यांच शोध निबंध सदरच्या शोध पत्रिकेत छापूनही आलेले आहे. चालू शैक्षणिक वर्षात मराठी विभाग प्रमुख डॉ. भाऊसाहेब मुळे यांनी दहिगावणे महाविद्यालय शेवगाव येथे तर प्रा. डॉ. वर्षा कीर्तने यांनी आकुर्डी महाविद्यालय आकुर्डी, पुणे येथे आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंध वाचून सहभाग नोंदविला.

२७ फेब्रुवारी हा दिवस कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस, मराठी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तो याही महाविद्यालयात वेगवेगळ्या कार्यक्रमांनी व उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या वर्षी मराठी दिनानिमित्त मराठी राजभाषेचे महत्त्व आणि म्हणी व वाक्प्रचार या विषयावर प्रा. श्री. अमृते यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य होते. या प्रसंगी महाविद्यालयातील मराठी विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याबरोबर अभ्यासक्रमासोबत इतरही उपक्रम मराठी विभागात नित्याने चालू असतात.

**मराठी विभाग प्रमुख, प्रा. डॉ. भाऊसाहेब मुळे**

## *Department of English*

*The department of English and faculty has been working intentionally for the enhancement of student's linguistic and literary skills, which will become the major cause for their employ ability in this global world.*

*The department has been contributing for the betterment of students ever since the college has started in this academic year (2018-2019) various activities were conducted for the students such as group discussion, role play, essay writing competition etc.*

*These all activities are important for students to gain confidence.*

**- Prof. Khollam M. C.**
*Head dept. of English*

## इतिहास विभाग अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ साली झाली. आणि तेव्हापासून इतिहास विभाग कार्यरत आहे. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी गुणवत्ता वाढीसाठी आणि विद्यार्थ्यामधील संभाषण कौशल्य आदी गुण विकसित होण्याच्या दृष्टीने इतिहास विभागातर्फे गट चर्चेचे आयोजन करण्यात आले होते.

व्यक्तीमत्व विकासासाठी व्याख्यानाचे आयोजन केले गेले. त्या माध्यमातून भविष्यात येणाऱ्या सर्व अडचणींना धैर्याने सामोरे कसे जावे, स्वसंरक्षण कशा प्रकारे केले जावे हे सांगण्याचा प्रामुख्याने प्रयत्न केला. जो आजच्या काळामध्ये आवश्यक आहे.

इतिहास विभागतर्फे विद्यार्थी व्यक्तीमत्व विकासाच्या प्रयत्नाबरोबरच सावित्रीबाई फुले जयंती, स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने इतिहास विभागाअंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. त्यामार्फत त्यांच्या जीवन चरित्राचा पट मांडण्यात आला. त्यामध्ये या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. इतिहास विभागास प्राचार्य डॉ. व्ही. एम. जाधव यांचे नेहमीच मोलाचे मार्गदर्शन लाभते.

**- प्रा. सोनवणे एस. आर.**
**(इतिहास विभाग प्रमुख)**

## समाजशास्त्र विभाग अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात समाजशास्त्र या विषयाची सुरुवात जून २००४ पासुन झाली. महाविद्यालयात समाजशास्त्र हा विषय प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष या वर्गात कला शाखेअंतर्गत शिकवला जातो. सन २०१२-१३ पासुन महाविद्यालयात समाजशास्त्र हा विषय विशेष स्तरावर शिकविण्यास सुरुवात झाली. सन २०१२-१३ मध्ये २० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. प्रथम वर्षाचा २०१२-१३ चा निकाल ९५% लागला असून व्दितीय वर्षाचा ९८% आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये व्दितीय वर्षात समाजशास्त्र विशेष विषयात ३० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर तृतीय वर्षास २२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान, जाणिव जागृती व्हावी म्हणुन विविध व्याख्याने आयोजित केली जातात. तसेच स्नेहालय, वृद्धाश्रम, बाल सुधारगृह या ठिकाणी समाजशास्त्र विभागाचे विद्यार्थी भेटी देवून अहवाल तयार करतात.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये व्दितीय वर्षाचा निकाल ९७% लागला असून तृतीय वर्षाचा निकाल ९८% लागला आहे. या वर्षामध्ये अनुक्रमे २५ व २७ विद्यार्थ्यांनी समाजशास्त्र या विषयात प्रवेश घेतला आहे. अशाप्रकारे नोकरी मिळविण्यासाठी व स्पर्धा परीक्षासाठी समाजशास्त्र विषयात विद्यार्थ्यांना आवड निवड होत आहे.

**- प्रा. डॉ. विजय जाधव**
**(समाजशास्त्र विभाग प्रमुख)**

## भूगोल विभाग अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बुऱ्हाणनगर, ता. जि. अहमदनगर या महाविद्यालयाची स्थापना २००४-०५ या वर्षी झाली. महाविद्यालायमध्ये भूगोल विभाग स्थापनेपासून कार्यरत आहे. विभागाच्या वतीने नवनवीन उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये पर्यावरण चळवळ, वाढती लोकसंख्या, साक्षरता अभियान, वृक्षारोपण, प्रश्न मंजुषा व तज्ञ अनुभवी व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली जातात.

भूगोल विषय हा स्पर्धा परिक्षा साठी महत्वाचा आहे. त्यामुळे विषयाचे विद्यार्थ्यांना ज्ञान वाढविण्यासाठी व एम.पी.एस.एस्सी., यु.पी.एस. एस्सी. परीक्षेमध्ये यश मिळविण्यासाठी भूगोल विषयाचा अभ्यास महत्वाचा मानला आहे.

भूगोल विभागामार्फत या वर्षी १४ जानेवारी २०१९ रोजी भूगोल दिन साजरा करण्यात आला यामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. पर्यावरण वाचवा... देश घडवा, भित्ती पत्रिका स्पर्धा, नकाशा वाचन व माहिती देण्यात आली.

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी १४ जानेवारी २०१९ 'भूगोल दिनानिमित्त' अहमदनगर महाविद्यालय अहमदनगर या ठिकाणी जावून प्रश्न मंजुशा मध्ये सहभाग नोंदविला. यामध्ये १) विटकर आदित्य रामदास २) कुऱ्हे श्रीनिवास अशोक ३) बनसोडे अण्णासाहेब भाऊसाहेब या बी.एस्सी. च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून व्दितीय क्रमांक मिळविला. त्यांना प्रशस्तीपत्रक व ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

या शैक्षणिक वर्षामध्ये व्दितीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान यामध्ये विद्यापिठांतर्गत पर्यावरण शास्त्र हा विषय सक्तीचा असून यामध्ये विविध विषय देऊन पर्यावरण पूरक माहिती विद्यार्थ्यांकडून तयार केली जाते. त्यामुळे समाजामध्ये पर्यावरणाविषयी आवड निर्माण होण्यास मदत होत आहे. यामध्ये प्राणी निरीक्षण, ग्रामीण विभाग पक्षी निरीक्षण शहर विभाग, औद्यागिक विभाग, कृषी विभाग इत्यादी विषय दिले जातात या मुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये भूगोल विषयामध्ये चांगले यश संपादन करुन विषयाचा १००% निकाल आहे. अशा प्रकारे भूगोल विभाग महाविद्यालायत कार्यरत आहे.

**- प्रा. साठे बी. जी.**
**(भूगोल विभाग प्रमुख)**

## वाणिज्य विभाग अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००५-०६ पासून वाणिज्य पदवी अभ्यासक्रम चालविला जातो.

या विभागांतर्गत प्रथम ते तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमातून वेगवेगळ्या २२ विषयांचे अध्यापन केले जाते.

विपणन व्यवस्थापन आणि कॉस्ट ॲण्ड वर्क्स अकौंटिंग हे दोन विषय व्दितीय व तृतीय वर्षात विशेष स्तरावर शिकविले जातात.

अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षापासूनच वाणिज्य शाखेच्या सर्व वर्गांच्या निकालाची परंपरा समाधानकारक आहे. त्याच प्रमाणे या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही प्रत्येक वर्षी वाढते आहे.

या शैक्षणिक वर्षात २०१८-१९ मध्ये वाणिज्य शाखेच्या तीनही वर्गांची एकुण विद्यार्थी संख्या ३१२ इतकी आहे.

अभ्यासक्रमा व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना उत्तेजन देणारे विविध कार्यक्रम, मान्यवरांची व्याख्याने राबविली जातात.

या विभागातील सर्वच शिक्षक, सहकारी, विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करत असतात.

**- प्रा. गाडे त्रिवेणी**
**(वाणिज्य विभाग प्रमुख)**

## अर्थशास्त्र विभाग अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अर्थशास्त्र हा विषय कला व वाणिज्य शाखेत शिकवला जातो. वाणिज्य शाखेत प्रथम व द्वितीय तसेच तृतीय वर्षांसाठी व्यावसायिक अर्थशास्त्र विषय शिकवला जातो.

सन २०१३-१४ पासुन प्रथम वर्षाला अर्थशास्त्र विषय प्रथम वर्ष कला शाखेत सुरु झाला. २०१४-१५ मध्ये द्वितीय वर्ष कला शाखेत अर्थशास्त्र हा विषय सुरु करण्यात आला व नंतर सन २०१५-१६ मध्ये तृतीय वर्षांमध्ये हा विषय सुरु करण्यात आला. अर्थशास्त्र विषयाबाबत विद्यार्थ्यांना आवड निर्माण झालेली दिसते. कारण एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी स्पर्धा परीक्षासाठी अर्थशास्त्र विषय महत्वाचा मानला जातो. तसेच अर्थशास्त्र विषयाला चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाला.

**- प्रा. जाधव के. एस.**

## भौतिक शास्त्र विभाग अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ मध्ये झाली. श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून बी.एस्सी हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. त्या अंतर्गत भौतिकशास्त्र हा प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षासाठी शिकवला जातो. भौतिकशास्त्र या विषयाबद्दल मुलांमध्ये गोडी निर्माण होत आहे आणि त्यामुळे विद्यार्थी संख्येत वाढ झाली. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रथम वर्ष बी.एस्सी. या वर्गात १२८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला, तर व्दितीय वर्षात ८१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. आणि तृतीय वर्षात ३१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर देण्यासाठी विविध प्रकारचे उपकरणे व विषयांशी निगडीत असणाऱ्या साहित्यांनी प्रयोगशाळा सुसज्ज आहे. तसेच मुलांच्या शैक्षणिक बुद्धीत वाढ करण्यासाठी प्रयोगशाळेत संगणक सुविधा उपलब्ध आहे. हे सर्व करताना संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**- प्रा. लोखंडे डी. जे. /प्रा. आरसुळे ए. सी.**

## रसायन शास्त्र विभाग अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना सन २००४ मध्ये झाली. आरंभी फक्त कला व वाणिज्य या दोन शाखा कार्यरत होत्या. मात्र त्यानंतर वाढती विद्यार्थी संख्या व विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता सन २०१३-२०१४ मध्ये विज्ञान शाखा सुरु करण्यात आली.

नैसर्गिक वाढीने हाच वर्ग टी. वाय. बी. एस्सी पर्यंत गेला आणि या वर्गात विशेष स्तरावर रसायन शास्त्र हा विषय सुरु करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रथम वर्ष बी.एस्सी. या वर्गात १२८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर व्दितीय वर्षात ११७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आणि तृतीय वर्षात ४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करण्यासाठी महाविद्यालयाने सुसज्ज अद्यावत व सर्व उपकरणे उपलब्ध असणारी सुविधायुक्त अशी प्रयोगशाळा तयार केली आहे. या विषयाचे प्रात्यक्षिक वेळेवर पूर्ण झालेले आहेत.

तसेच अध्यापनासोबत महाविद्यालयातील प्राध्यापक महाविद्यालयीन उपक्रमांमध्ये भाग घेतात. विविध महाविद्यालयामध्ये होणाऱ्या चर्चासत्रात संशोधन परिषद कार्यशाळेत उपस्थित राहतात.

हे सर्व करताना प्रा. मोहिते सी. पी., प्रा. नामदे एम. आर. प्रा. सोनवणे के. एच. तसेच संस्थेचे प्राचार्य यांचे सहकार्य लाभले

**- प्रा. मोहिते सी.पी.**
**(बी.एस्सी. रसायनशास्त्र विभाग प्रमुख)**

## वनस्पती शास्त्र विभाग अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना सन २००४ मध्ये झाली. त्यानंतर सन २०१३-१४ पासून विज्ञान शाखेला सुरुवात झाली तेव्हापासून वनस्पतीशास्त्र हा विभाग महाविद्यालयामध्ये कार्यरत आहे. त्यामध्ये प्रथम वर्षापासून तृतीय वर्षापर्यंत वर्ग कार्यरत आहेत.

या विषयासाठी प्रथम वर्षांचे व व्दितीय वर्षाचे व तृतीय वर्षाचे ०८ विद्यार्थी प्रवेशित आहेत.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात वाढ करण्यासाठी उद्ययावत प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामध्ये उत्कृष्ठ प्रतीचे मायक्रोस्कोप, स्लाइड चार्टस् तसेच उच्च दर्जाचे उपकरणे व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे नविन संशोधन कार्यात विकास होण्यासाठी प्राध्यापकांना विविध परिषदा व कार्यशाळेला पाठविण्यात आले तसेच या वर्षी विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमातील प्रकल्पासाठी शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. वनस्पतीशास्त्र उद्यानाची चांगली निर्मिती करण्यात आली.

हे सर्व करताना प्रा. वाघ एस. जी., प्रा. मेहेत्रे एस. ए., प्रा. वैद्य सी. आर. तसेच संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य व सर्व शिक्षक यांचे सहकार्य लाभले.

**– प्रा. मेहेत्रे एस. ए.**

## प्राणीशास्त्र विभाग अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना सन २००४ मध्ये झाली. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून विज्ञान शाखेला सुरूवात झाली. तेव्हापासून प्राणीशास्त्र हा विभाग कार्यरत आहे.

या विभागांतर्गत प्रथम वर्षापासून व्दितीय वर्षापर्यंतचे वर्ग कार्यरत आहे. त्यानुसार सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर घालण्यासाठी अद्ययावत प्रयोगशाळा व त्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक ती उपकरणे व साधने त्याचप्रमाणे प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक ती प्राण्यांच्या संबंधित नमुने आहेत. अशा प्रकारे प्राणीशास्त्र विभागाची प्रयोगशाळा सुसज्ज आहे.

विद्यार्थ्यांची प्राणीशास्त्र त्याचप्रमाणे आत्मबल वाढविण्यासाठी महाविद्यालयाची प्राध्यापकांना व्याख्यान व त्याचप्रमाणे राष्ट्रीय पातळीवर परिषदेला पाठविण्यात आले. चालू असलेल्या शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्राध्यापक बांगरे एस. डी. व प्राध्यापक लहारे एन. टी. विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण केली.

येणाऱ्या वर्षातही प्राणीशास्त्र विभागाची यश संपादन करण्याप्रमाणे सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, प्राचार्य व उपप्राचार्य सहयोग राहिल. यश संपादन करण्याची कार्यपद्धती चालू ठेवेल व विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देईल.

अशा प्रकारे प्राणीशास्त्र विभाग महाविद्यालय कार्यरत आहे.

**– प्रा. बांगरे एस. डी., प्रा. लहारे एन. टी.**
**(प्राणीशास्त्र विभाग)**

## बी.सी.एस. विभाग अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बी.सी.एस्. अभ्यासक्रमाची सुरूवात शैक्षणिक वर्ष २००८ पासून करण्यात आली.

बी.सी.एस्. विभागातील तृतीय वर्ष मुलांसाठी टी.सी.एस्. सारख्या नामांकित कंपनीमधील मिलिंद सोनवणे व त्यांच्या टीमने "Online exam & interview" च्या तयारीबाबत मार्गदर्शन पर व्याख्यानाचे आयोजन केले होते तसेच seed infotech या कंपनीने महाविद्यालयात एक स्पर्धा आयोजित केली होती.

सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना विषयज्ञान चांगले

मिळण्यासाठी विविध गेस्ट लेक्चर आयोजित करण्यात आले.

विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच स्पर्धा परीक्षेचेही ज्ञान देण्यासाठी विविध मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत संगणक लॅब उपलब्ध करुन देण्यात आली. यामध्ये हाय प्रोसेसरचे कॉम्प्युटर, उच्च प्रतिचे प्रिन्टर्स तसेच बॅकअप साठी यु.पी.एस. व १६ एक्साइड बॅटरी उपलब्ध करुन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी ब्रॉडबॅण्ड सुविधा पुरविण्यात आली. विद्यार्थ्याप्रमाणेच प्राध्यापकांच्या नवीन टेक्नॉलॉजी अवगत होण्यासाठी विविध वर्कशॉप, सेमिनार इ. मध्ये पाठविण्यात आले.

हे सर्व करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

**– प्रा. काळे व्ही. ए. (बी.सी.एस्. विभाग)**

## बी.सी.ए. विभाग अहवाल २०१८–१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बी.सी.ए. अभ्यासक्रमाची सुरूवात शैक्षणिक वर्ष २००८–०९ पासून करण्यात आली.

बी.सी.ए. अभ्यासक्रमांतर्गत असणाऱ्या विविध विषयांत प्राविण्य असलेल्या प्राध्यापकांना विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी बोलविले जाते.

तसेच टी.वाय. बी.सी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रोजेक्ट गाईडन्स करिता तज्ञ अध्यापकांना आमंत्रित करण्यात आले.

विद्यार्थ्यांसाठी अद्यावत संगणक लॅब उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामध्ये उत्कृष्ट प्रतिचे संगणक व प्रिन्टर उपलब्ध आहेत. तसेच युपीएस बँक अप व ब्रॉडबॅण्ड इंटरनेट सुविधाही उपलब्ध आहेत. बी.सी.ए. अंतर्गत येणाऱ्या सर्व विषयांसाठी उच्च दर्जाच्या प्राध्यापकांची नेमणूक करण्यात आली आहे.

तसेच नवीन टेक्नॉलॉजी अवगत होण्यासाठी प्राध्यापकांना विविध वर्कशॉप, कार्यशाळा, सेमीनीर इ. मध्ये पाठविण्यात आले आहे.

शिक्षणाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना वाव मिळवण्यासाठी विविध प्रकारच्या गेम्सचे आयोजन केले जाते. टी.वाय.बी.सी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट मार्गदर्शनाची व्यवस्था करण्यात आली.

हे सर्व करताना संस्थेचे पदाधिखारी, प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यात्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

**– प्रा. कर्डीले व्ही. बी. (बी.सी.ए. विभाग प्रमुख)**

## हिंदी विभाग अहवाल – २०१८–१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय में २००४–०५ से हिंदी विभाग कार्यरत है । २०१२–१३ से विशेष स्तरपर यह विषय पढ़ाया जाता है । हिंदी विषय में छात्रों की रूची निर्माण होने के लिए समय–समय पर व्याख्यानों का आयोजन महाविद्यालय में किया जाता है । विशेषस्तर पर हिंदी पढ़नेवाले छात्रों को विभिन्न क्षेत्र में नोकरी करने के अवसर प्राप्त हो सकते है । इसके बारे में छात्रों को विभिन्न व्याख्याताओं के द्वारा मार्गदर्शन किया जाता है ।

महाविद्यालय मे हरवर्ष १४ सितंबर हिंदी दिवस के रूप में मनाया जाता है। इस वर्ष भी हिंदी दिवस महाविद्यालय में मनाया गया ।

महाविद्यालय के अध्यापक हर वर्ष अलग–अलग महाविद्यालयों में संगोष्ठी में संम्मिलित होते है । इस वर्ष भी विभिन्न महाविद्यालयों के संगोष्ठी में संम्मिलित हुए ।

गत वर्ष आयोजित परीक्षाओं में विद्यार्थीयोंने कामयावी हासिल की । और विभिन्न क्षेत्रो में कार्यरत हे ।

**प्रा. डॉ. शेख आर एच. (हिंदी विभाग प्रमुख)**

## इलेक्ट्रॉनिक्स शास्त्र विभाग अहवाल २०१८–१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना सन २००४ मध्ये झाली. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासून विज्ञान शाखेला सुरूवात झाली. तेव्हापासून इलेक्ट्रॉनिक्स हा विभाग सुरू करण्यात आला आहे. या विभागंतर्गत प्रथम

वर्षापासून ते व्दितीय वर्षापर्यंतचे वर्ग कार्यरत आहे. या विषयासाठी प्रथम वर्षाचे ६२ विद्यार्थी व व्दितीय वर्षाचे ४७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर घालण्यासाठी अद्यावत प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामध्ये उच्चप्रतिची उपकरणे व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच नवीन संशोधन कार्यात विकास होण्यासाठी प्राध्यापकांना विविध संशोधन परिषदा, व कार्यशाळांना पाठविण्यात येते. अशा प्रकारे महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स विभाग कार्यरत आहे हे सर्व करताना संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला

**– प्रा. धर्माधिकारी एस. एस.**
**(इलेक्ट्रॉनिक्स विभाग)**

## 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना' अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे परंतु ज्यांना शिकण्याची आकांक्षा आहे असे विद्यार्थी 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजनेचा लाभा घेऊ शकतात. ही योजना महाविद्यालयात २००५ सालापासून कार्यरत असून आज मितीस ३३ विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत असून आपले शिक्षण घेत आहेत आणि हाच उद्देश 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजनेचा आहे.

या योजनेतून विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीबरोबच अनेक कामे करण्याची संधी मिळते. ग्रंथालय विभाग, संगणक विभाग, प्रयोगशाळा, कार्यालय, वृक्षसंवर्धन, बागकाम अशा विविध विभागांमध्ये काम करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांना अभ्यासाबरोबर इतर विभागांचेही ज्ञान मिळते. तसेच विद्यार्थ्यांना मूल्य शिक्षणा सोबतच श्रम संस्काराचे महत्व कळाले.

**– प्रा. डॉ. कीर्तने व्ही. एस्.**
**कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना**

## राष्ट्रीय सेवा योजना अहवाल २०१८-१९

राष्ट्रीय सेवा योजना हा विभाग महाविद्यालयातील महत्त्वपूर्ण आणि वैशिष्टपूर्ण असा हा विभाग आहे. मुलांमध्ये समाजसेवेची ऋची निर्माण व्हावी व त्यांच्यातील नेतृत्व गुण विकसित व्हावेत हा उद्देश नेहमीच या विभागाचा आहे. राष्ट्रभान, सेवावृत्ती, नम्रता व समतेची शिकवण देणारा हा विभाग महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच कार्यरत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मधील शैक्षणिक वर्षात या विभागाने विविध उपक्रम राबविले आहेत. जून च्या पहिल्या आठवड्यात या विभागाच्या विविध कामांचे व उपक्रमांचे उद्घाटन मा. प्राचार्यांच्या हस्ते व राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झाले. या जुलैमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या, राष्ट्रीय सेवायोजनेच्या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या मार्फत अनेक वृक्षांचे रोपन करण्यात आले. तसेच त्यांना ट्रीगार्ड बसवून त्यांचे संवर्धन करण्यात आले.

म. गांधीचींच्या जयंती निमित्त स्वच्छता पंधरवडा महाविद्यालयात साजरा करण्यात आला. त्यात ग्रामस्वच्छता, मंदीर स्वच्छता, महाविद्यालय परिसर स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. तसेच गावातून स्वच्छता रॅली काढून जनजागृती करण्यात आली. या बरोबरच महाविद्यालयीन युवकांना मतदान जन जागृतीविषयक व्याख्यानाचे आयोजनही या विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आले.

या उपक्रमांसोबतच ३१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर या कालावधीत पिंपळगाव उज्जैणी ता नगर येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात सक्षम

युवा व समर्थ भारत अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले त्यात, बेटी बचाओ बेटी पढाओ, ग्राम स्वच्छता, वृक्ष संवर्धन, व्यसनमुक्ती आदि उपक्रम राबविण्यात आले. तसेच, राष्ट्रीय सेवा योजनेतील शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी चाळीस फुट लांब व वीस फुट रूंद पुलाचे काम श्रमदानातून करुन दिले. तसेच वनराई बंधारा बांधून देऊन पाणी अडवा पाणी जिरवा हा संदेश गावकऱ्यांना दिला. या बरोबरच तेथील मंदीर स्वच्छता, ग्रामस्वच्छता, समाज मंदिर स्वच्छतेचे कामही शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी केले.

या बरोबरच 'हागणदारी मुक्ती' व 'व्यसन मुक्ती' या विषयावर प्रबोधनपर पथनाट्य सादर करुन ग्रामस्थांची जनजागृती केली. या आणि अशा विविध उपक्रमांनी युक्त हा राष्ट्रीय सेवा योजना विभाग महाविद्यालयामध्ये सतत कार्यरत आहे.

**– राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी**
**प्रा. डॉ. भाऊसाहेब मुळे**

## शारीरिक शिक्षण क्रीडा विभाग अहवाल २०१८-१९

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये दरवर्षी विविध खेळांमध्ये आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या उत्साहात सहभागी होतात. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विद्यार्थ्यांनी पुढील स्पर्धांमध्ये सहभागी होऊन क्रीडा क्षेत्रात यश (नैपुण्य) संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष मा. आमदार शिवाजीराव कर्डिले साहेबांनी व संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच प्राचार्यांनी केले.

**✻ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ –**

**✻ आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा –**

**१) कुस्ती** :– आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा टाकळी ढोकेश्वर महाविद्यालय येथे पार पडल्या त्यात एकूण १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात (१) अभिमन्यु फुले – प्रथम (एफ.वाय. बी.ए.), (२) ऋषीकेश लांडे – प्रथम (एस.वाय. बी.ए.), (३) विलास ढोणे – (टी.वाय. बी.एस्सी.), (४) राहुल शिर्के – प्रथम (टी.वाय. बी.सी.ए.), या विद्यार्थ्यांची सावित्रीबाई फुले आंतरराष्ट्रीय पातळीवर निवड झाली.

**(२) ज्युदो –** आंतरमहाविद्यालयीन ज्युदो स्पर्धा पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर येथे पार पडल्या त्यात – (१) विलास ढोणे (टी.वाय. बी.एस्सी.) याने प्रथम क्रमांक मिळविला व त्यांची आंतरराष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली. कु. दुसुंगे (एस.वाय. बी.कॉम.) हिने सहभाग घेतला होता.

**(३) मल्लखांब –** आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धा पी.व्ही.पी. कॉलेज लोणी येथे पार पडल्या त्यात अनिकेत सुसरे (टी.वाय. बी.एस्सी.) याने प्रथम क्रमांक मिळविला व त्याची आंतरविभागीय पातळीवर निवड झाली.

**(४) बॉक्सिंग** :– आंतरमहाविद्यालय बॉक्सिंग स्पर्धा सी.डी. जैन महाविद्यालय श्रीरामपूर येथे पार पडल्या. त्यात कु. अनुजा उनवणे (एफ.वाय. बी.ए.) हिने प्रथम क्रमांक मिळवून तिची निवड आंतरविभागीय पातळीवर झाली.

**(५) ॲथलेटिक्स** :– ॲथलेटिक्स क्रीडा स्पर्धा संगमनेर महाविद्यालय पार पडल्या. त्यात ५ विद्यार्थ्यी सहभागी होवून चांगली कामगिरी केली.

**(६) रायफल शुटींग** :– आंतरमहाविद्यालयीन रायफल शुटींग स्पर्धा बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी येथे पार पडल्या. त्यात प्रदीप सुपेकर (एस.वाय. बी.सी.ए.) चा विद्यार्थी याने प्रथम क्रमांक मिळवून त्याची निवड आंतरविभागीय पातळीवर झाली.

**✻ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरविभागीय**

स्पर्धेत निवड झालेले विद्यार्थी :-

**(१) कुस्ती** :- आंतरविभागीय कुस्ती स्पर्धा बारामती येथे पार पडल्या त्यात (१) अभिमन्यु फुले (एस.वाय. बी.ए.) व (२) ऋषीकेश लांडे (एस.वाय. बी.ए.) प्रथम क्रमांक मिळवला.

**(२) ज्युदो** :- आंतरविभागीय ज्युदो स्पर्धा नाशिक येथे पार पडल्या त्यात विलास ढोणे (एस.वाय. बी.एस्सी.) याने चांगली कामगिरी केली.

**(३) मल्लखांब** :- आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धा पी.व्ही.पी. कॉलेज लोणी येथे पार पडल्या त्यात अनिकेत सुसरे याने चांगली कामगिरी केली.

**(४) बॉक्सिंग** :- आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धा बी.जे.एस. कॉलेज, पुणे येथे पार पडल्या त्यात कु. अनुजा उनवणे हिने चांगली कामगिरी केली.

**✻ रायफल शुटींग** :- आंतरविभागीय रायफल शुटींग स्पर्धा पुणे येथे पार पडल्या त्यात प्रदिप सुपेकर याची निवड झाली होती.

**अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धा हरियाणा येथे पार पडल्या.** त्यात (१) ऋषीकेश लांडे, (२) अभिमन्यु फुले यांची निवड झाली होती त्यात त्यांनी चांगली कामगिरी केली.

**(१) जनता महाविद्यालय, रुईछत्तीसी, (२) राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अ.नगर, (३) संत दासगणू महाविद्यालय,** श्री बाणेश्वर महाविद्यालय बुऱ्हाणनगर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत निर्भयकन्या अभियानांतर्गत मुली व महिलांना स्वसंरक्षणाचे मार्गदर्शन केले व प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले.

बाई इचरजबाई विद्यालयात वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण प्रसंगी मार्गदर्शन केले.

**- प्रा. मनिषा पुंडे**
**(शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख)**

## विद्यार्थी विकास मंडळ अहवाल २०१८-१९

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बुऱ्हाणनगर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालया-मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, निर्भय कन्या अभियान तसेच आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन या शैक्षणिक वर्षात करण्यात आले.

महाविद्यालयातील मुली निर्भय व्हाव्यात या दृष्टिने महाविद्यालामध्ये निर्भय कन्या अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत शंभर मुलींनी सहभाग नोंदविला व तसेच वेगवेगळ्या व्याख्यात्यांनी मुलींना मार्गदर्शन केले.

आपत्ती आल्यास आपत्तीला कसे सामोरे जावे या साठी आपत्ती व्यवस्थापन कार्य शाळेचे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवसीय कार्यशाळेत वेगवेगळ्या व्याख्यात्यांच्या व्याख्यानांचे तसेच प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले.

यावर्षी वेगळा उपक्रम म्हणून उर्जा बचत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले यामध्ये विद्यार्थ्यांना उर्जा बचतीचे महत्व पटवून देण्यात आले.

या विभागांतर्गत रॅगींग समिती अस्तित्वात आहे व तिचे काटेकोर पालन केले जाते.

विद्यार्थ्यांना येणाऱ्या वेगवेगळ्या समस्यांचे निवारण या विभागामार्फत केले जाते.

या प्रकारे महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास मंडळ कार्यरत आहे.

**- प्रा. डॉ. शेख आर. एच.**
**विद्यार्थी विकास अधिकारी**

# ग्रंथालय विभाग अहवाल २०१८-१९

ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा असतो. एखादया संस्थेची गुणवत्ता अनेक बाबींवर अवलंबून असते. ग्रंथालय हा त्यापैकी एक घटक आहे. विविध प्रकारच्या ग्रंथांनी समृद्ध असलेले ग्रंथालय हे त्या महाविद्यालयाचा अविभाज्य भाग असतो.

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथालय हे ग्रंथांच्या समृद्धीमुळे प्रसिध्द आहे. या ग्रंथालयाला चौदा वर्षाची परंपरा लाभलेली आहे. सध्या ग्रंथालयात मराठी, इंग्रजी, हिंदी आदी भाषांची सुमारे ६९०५ ग्रंथ संख्या आहे. तसेच यावर्षी ३७,०९५/- किंमतीचे २६४ ग्रंथ खरेदी केले आहेत. ग्रंथालयाच्या समृद्धतेमध्ये विविध प्रकारची क्रमिक पुस्तके, संदर्भ पुस्तके व अवांतर पुस्तके आहेत. त्याचप्रमाणे विविध विषयांची राष्ट्रीय व राज्यस्तरीय ३२ नियतकालिके नियमित ग्रंथालयात येत असतात. त्याचबरोबर ०९ वर्तमानपत्रे ग्रंथालयात येतात.

**✻ ग्रंथालयाचे विशेष उपक्रम :-**

**✻ नियतकालिका सेवा :-** ग्रंथालयामध्ये विविध विषयाची नियतकालिके येत असतात. त्या नियतकालिकांची विद्यार्थ्यांना ग्रंथालयामध्ये वाचनासाठी दिली जातात. तसेच शिक्षकांना विद्यार्थ्यांना प्रचलित माहिती देण्यासाठीही याचा उपयोग होतो.

**✻ संदर्भ सेवा :-** ग्रंथालयात विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना विविध विषयांची संदर्भ पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात. तसेच विविध नियतकालिकातील, वर्तमान पत्रातील संदर्भ दिले जातात.

**✻ कात्रण सेवा :-** ग्रंथालयाने महत्त्वाच्या विविध विषयांची वृत्तपत्रातील लेखांची कात्रणे संग्रहित केलेली असून संबंधित संशोधकांना संशोधनात मदत करण्यास प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना ती ग्रंथालयात उपलब्ध करून दिली जातात.

**✻ करिअर गाईडन्स :-** विद्यार्थ्यांना विविध प्रकारची करिअर विषयक पुस्तके, नियतकालिके दिली जातात. तसेच स्पर्धा परिक्षा विषयक अदयावत पुस्तके, नियतकालिके व रोजगार, नोकरी विषयक अदयावत पुस्तके, साप्ताहिके, प्रश्नसंच उपलब्ध करुन दिली जातात.

**✻ ग्रंथालयाची माहिती :-** (१) ग्रंथसंपदा :- ६९०५

(२) ऑडिओ व्हिडिओ सीडीज् - २२५

(३) नियतकालिके - ३२

- (१) कला शाखा - २१
- (२) वाणिज्य शाखा - ०४
- (३) विज्ञान शाखा - ०७

(४) वृत्तपत्रे - ०९

**✻ ग्रंथालय सुविधा :-** रिडींग हॉल, न्युज पेपर, क्लिपींग, संदर्भ सेवा, करिअर गाईडन्स मार्गदर्शन.

- झोंड सचिन अंबादास (ग्रंथालय विभाग प्रमुख)

## बहिःशाल शिक्षण मंडळ वार्षिक अहवाल २०१८-१९

बहिःशाल शिक्षण मंडळ पुणे व पुणे विद्यापीठ पुणे यांच्या अंतर्गत आमच्या महाविद्यालयात दि. ०१/०१/२०१९ ते ०५/०१/२०१९ दरम्यान डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. व्ही.एम. जाधव, प्रा. बाबासाहेब खरात, विद्यार्थी-विद्यार्थीनी, प्राध्यापक वृंद व कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. गाडे टी.डी. उपस्थित राहून उद्घाटन समारंभ झाला. व्याख्यानमालेत विविध विषयावर व्याख्याने देण्यात आले.

दि. ०३/०१/२०१९ रोजी मा.प्रा. बाबासाहेब खरात यांनी 'आजच्या युवकांसमोरील आव्हाने' या विषयावर व्याख्यान दिले. आजचा युवक हा कसा असला पाहिजे. त्याने काय आव्हाने स्विकारले पाहिजे व कशाप्रकारे युवकांनी देशहितामध्ये सहभागी झाले पाहिजे. अशा प्रकारचे बहुमोल मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

दि. ०४/०१/२०१९ रोजी मधुकर कुलकर्णी यांचे नटसम्राट हे एकपात्री झाले. त्यांनी एकपात्री सादर केली व खरा नटसम्राट विद्यार्थ्यांसमोर सादर केला. अशाप्रकारे त्यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

दि. ०५/०१/२०१९ रोजी मा. बाबासाहेब खराडे यांनी हसण्यासाठी जन्म आपुला या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी आपल्या व्याख्यानातून अनेक मुद्दे मांडले व विद्यार्थ्यांना भरपूर हसवून त्यांचे मनोरंजन केले. आपल्या जीवनात हसण्याचे किती महत्त्व आहे हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

या कार्यक्रमाची सांगता समारंभ ०५/०१/२०१९ रोजी श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एम. जाधव, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित राहून डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेची सांगता झाली.

या शैक्षणिक वर्षात जे जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ, कलावंत, साहित्यिक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत धुरंधर राजकारणी, संस्थेवर मनःपूर्वक प्रेम करणारे सहृदय, स्नेही, हितचिंतक, महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी त्यांचे आप्तेष्ट, विद्यार्थी दिवंगत झाले. अशा लाखो निष्पाप जीवांना संस्थेच्या व सर्व युनिटच्या वतीने

